बिसेन डेन्टल केअर

डॉ.दिप(पंकज) बिसेन    डॉ.खुशबू बिसेन(पटले)

दंत व मुख रोगविशेषज्ञ

बी.डी.एस.(नागपूर)

ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया

सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०



साप्ताहिक    http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे






गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध



आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१२ गोंदिया | अंक ०३ | बुधवार,दि.२८ डिसेंबर २०२२ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2022-2024




## घातपाताच्या तयारीत असलेल्या जहाल नक्षलवाद्यास अटक

**गोंदिया:** भामरागड तालुक्यातील नेलगुंडा येथे लपून बसलेल्या वत्ते ऊर्फ प्रदीप वंजा वड्डे नामक ४० वर्षीय नक्षलवाद्यास पोलिसांनी रविवार, २५ डिसेंबरला अटक केली. वत्ते ऊर्फ प्रदीप वड्डे हा घातपात करण्याच्या हेतूने नेलगुंडा या स्वगावी लपून होता. माहिती मिळताच विशेष अभियान पथकाच्या जवानांनी त्यास ताब्यात घेतले.

वत्ते हा १९९७ मध्ये नक्षल दलममध्ये भरती झाला. सध्या तो भामरागड दलमचा सदस्य म्हणून कार्यरत होता. त्याच्यावर ८ हत्या, ३ चकमकी, १ दरोडा आणि अन्य एक अशा १३ गुन्ह्यांची नोंद आहे. शासनाने त्याच्यावर २ लाख रुपयांचे बक्षीस जाहीर केले होते, अशी माहिती पोलिसांनी दिली. गडचिरोली पोलीस दलाने जानेवारी २०२२ पासून आतापर्यंत ६० नक्षलवाद्यांना अटक केली आहे. शिवाय ८ नक्षल्यांनी पोलिसांपुढे आत्मसमर्पण केले आहे, तर ३ नक्षल्यांना ठार करण्यात पोलिसांना यश आले आहे. पोलीस अधीक्षक नीलोत्पल, अपर पोलीस अधीक्षक (अभियान) अनुज तारे, अपर पोलीस अधीक्षक (प्रशासन) कुमार चिंता, अहेरीचे अपर पोलीस अधीक्षक यतीश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.

# कर्नाटकाच्या मराठी विरोधी प्रवृत्तीचा निषेधाचा मुख्यमंत्र्यांनी मांडलेला ठराव एकमताने मंजूर




**नागपूर,:** कर्नाटक शासनाच्या मराठी विरोधी प्रवृत्तीचा तीव्र शब्दांत निषेध करणारा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मांडलेला ठराव आज महाराष्ट्र विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहात एकमताने मंजूर करण्यात आला.

**शासकीय ठरावात काय?**

"नोव्हेंबर १९५६ मध्ये राज्यांची पुनर्रचना झाल्यानंतर तत्कालीन मुंबई राज्यातील बेळगाव (चंदगड तालुका वगळून) विजापूर, धारवाड व कारवार हे मराठी भाषिक जिल्हे पूर्वीच्या म्हैसूर राज्यात विलीन करण्यात आले. महाराष्ट्राने खेडे हे एक घटक, भौगोलिक सलगता, मराठी किंवा कन्नड भाषिक लोकांची सापेक्ष बहुसंख्या व लोकेच्छा या सुत्रानुसार फेररचनेची मागणी केली आणि कर्नाटकातील ८६५ सीमावादीत गावांवर दावा सांगितला आहे."महाराष्ट्र राज्य शासनाने दावा केलेली ८६५ गावे समाविष्ट व्हावी म्हणून महाराष्ट्र शासनाने केंद्र शासन व कर्नाटक राज्य शासन यांच्याविरुध्द सर्वोच्च न्यायालयात २९ मार्च २००४ रोजी मूळ दावा क्र. ४/२००४ दाखल केला आहे. सर्वोच्च न्यायालयात अंतरिम अर्ज क्र. आयए ११/२०१४ वर सुनावणी अंती १२ सप्टेंबर २०१४ रोजी दाव्यातील साक्षी, पुरावे नोंदविण्यासाठी कोर्ट कमिशनर म्हणून मनमोहन सरीन, भूतपूर्व मुख्य न्यायाधीश जम्मु काश्मीर यांची नियुक्ती केली. परंतु १२ सप्टेंबर २०१४ रोजी पारित केलेल्या सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशात सुधारणा करावी या मागणीसह कर्नाटक शासनाने ६ डिसेंबर २०१४ रोजी अंतरिम अर्ज क्र. आयए १२/२०१४ सर्वोच्च न्यायालयात दाखल केला. सीमावादाचा प्रश्न न्यायप्रविष्ट असून ही कायदेशीर लढाई महाराष्ट्र शासन सर्व ताकदीने लढत आहे. महाराष्टच्या बाजुने खटला चालविण्यासाठी या क्षेत्रातील अनुभवी असणारे ज्येष्ठ, अनुभवी व नामांकीत विधिज्ञांची पॅनलवर नियुक्ती केली आहे.

सीमा भागातील प्रश्न, सीमा भागातील लाखो मराठी भाषिकांवर तेथील प्रशासनाकडून वर्षानुवर्ष होणारे अन्याय, मराठी भाषिकांना मिळत असलेली दुय्यम वागणूक, त्यांचेवर अत्याचार केले जाणे, त्यांच्या जीविताचा प्रश्न गंभीर होणे, इतकेच नव्हे तर समन्वयक मंत्री, सीमाप्रश्न यांनाच कर्नाटकमध्ये प्रवेश करण्यास कर्नाटक प्रशासनाकडून बंदी घालणे, मराठी भाषिकांनी आतापर्यंत शांततेने काढलेल्या अनेक पदयात्रांवर कर्नाटक पोलिसांनी अमानुषपणे लाठीमार करणे, त्यांची आंदोलने चिरडण्याचा प्रयत्न करणे व महाराष्ट्र राज्यातील वाहनांवर हल्ले करणे, तेथील मराठी भाषिकांच्या जमिनी स्थानिक विकास प्राधिकरणांकरिता संपादित करुन त्यांचे भुखंड कन्नड भाषिकांना वितरीत करणे, तसेच अल्पसंख्य आयोगाने व उच्च न्यायालयांनी दिलेल्या मराठीसह दोन्ही भाषांमध्ये स्थानिक प्राधिकरणातील दिली जाणारी शासकीय सर्व कागदपत्रे आदेशाची अंमलबजावणी न करता स्थानिक मराठी भाषिकांची संख्या कमी करण्यासाठी प्रयत्न करणे इत्यादी बाबी कर्नाटकातील स्थानिक प्रशासनाकडून जाणीवपुर्वक केला जात आहे.

या सर्व बाबींवर केंद्र शासनाने हस्तक्षेप करण्यासाठी १४ डिसेंबर २०२२ रोजी केंद्रीय गृहमंत्री यांनी नवी दिल्ली येथे कर्नाटकचे मुख्यमंत्री आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री व उप मुख्यमंत्री यांच्या बैठकीत दोन्ही राज्यांमध्ये समन्वय ठेऊन सर्वोच्च न्यायालयाचा निकाल येईपर्यंत वाद न वाढविता शांतता ठेवण्याकरिता एकमत केले. असं असतानाही कर्नाटक शासनाने विपरीत भूमिका घेतलेली आहे. दरम्यान कर्नाटक विधीमंडळाने एकही इंच जमीन न देण्याच्या २२ डिसेंबर २०२२ रोजी केलेल्या ठरावामुळे सीमावादाला चिथावणी देण्याचे काम कर्नाटक सरकारकडून जाणीवपूर्वक केले जात आहे. कर्नाटक शासनाची ही भूमिका लोकशाही संकेतास धरुन नाही. एकाच देशातील दोन राज्यांमध्ये सौहार्दाचे वातावरण राहावे यासाठी महाराष्ट्राने अत्यंत खंबीरपणे व सर्व शक्तीनिशी याबाबतचा कायदेशीर लढा सनदशीर मार्गाने सुरू ठेवला आहे.

सद्यःस्थितीत कर्नाटक राज्यात असलेल्या सीमाभागातील ८६५ मराठी भाषिक खेडे घटक, भौगोलिक सलगता, मराठी भाषिक लोकांची सापेक्ष बहुसंख्यता व महाराष्ट्रात समाविष्ठ होण्यासाठीची तेथील लोकेच्छा या तत्वांचा महाराष्ट्र राज्याने नेहमीच आदर केला आहे. त्याअनुषंगाने त्यांच्या सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक उन्नतीसाठी विविध सोईसुविधा व सवलती उपलब्ध करुन दिल्या आहेत. त्यात मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या लाभांबरोबरच अभियांत्रिकी/वैद्यकीय शिक्षणाच्या प्रवेशासाठी विशेष सवलत, भारतीय प्रशासकीय सेवा पूर्वप्रशिक्षणासाठी सवलत, सारथी व इतर शासकीय संस्थांच्या मार्फत विहीत अर्थसहाय्य उपलब्ध करुन देण्यात आले आहे.

आता महाराष्ट्र विधानसभा याद्वारे कर्नाटक प्रशासनाच्या मराठी विरोधी प्रवृत्तीचा तीव्र शब्दांत निषेध करण्याबरोबरच महाराष्ट्र विधानसभा नियम ११० नुसार,

कर्नाटकातील बेळगाव, कारवार, निपाणी, भालकी, बिदर या शहरांसह मराठी भाषिक ८६५ गावांची इंच न इंच जागा तिथल्या मराठी भाषिक नागरिकांसह कोणत्याही परिस्थितीत महाराष्ट्रात समाविष्ठ करण्यासाठी आवश्यक तो सर्व कायदेशीर पाठपुरावा सर्वोच्च न्यायालयात करण्यात येईल.

सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असलेला सीमावाद हा सनदशीर मार्गाने अत्यंत खंबीरपणे दृढ निश्चयाने व संपूर्ण ताकदीनिशी लढा देण्यात येईल.

८६५ गावातील मराठी भाषिक जनतेसोबत महाराष्ट्र शासन खंबीरपणे निर्धाराने व सर्व ताकदीनिशी उभे आहे.याबाबत केंद्र शासनाने गृहमंत्री भारत सरकार यांच्या बैठकीत झालेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याचा आग्रह कर्नाटक शासनाकडे धरावा. तसेच सीमा भागातील मराठी जनतेच्या सुरक्षिततेची हमी घेण्याबाबत सरकारला समज देण्यात यावी.

# जुन्या पेंशनसाठी लाखोच्या संख्येत कर्मचारी धडकले विधानभवनावर



**नागपूर–** महाराष्ट्र राज्य जुनी पेंशन संघटनेसह इतर सर्व राज्य कर्मचारीसंघटनानी आज जुनी पेंशन लागू करण्याच्या मागणीला घेऊन नागपूरच्या विधानभवनावर लाखोच्या संख्येत धडक देत राज्यसरकारला इशारा दिला.महाराष्ट्र राज्य जुनी पेंशन संघटनेच्या या मोर्च्याला राज्यभरातील लाखाच्यावर कर्मचारी उपस्थित होते.आमदार कपिल पाटील यांनी आंदोलकांची मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबत भेट करवून देत मागण्यावर चर्चा करीत निवेदन सादर केले.यावेळी मंत्री शंभुराज देसाई सुध्दा उपस्थित होते. अनेक राज्यांमध्ये जुनी पेन्शन योजना लागू करण्याची मागणी जोर धरत आहे. जुनी पेन्शन योजना लागू करण्याची अनेक दिवसांपासून सरकारी कर्मचाऱ्यांची मागणी आहे.राजस्थान,छत्तीसगड आणि पंजाबमध्ये सरकार पुन्हा एकदा जुन्या पेन्शन योजनेकडे वळले आहे.





## कर्मचारी संघटनेने केला माजी खासदार अडसुळांचा निषेध



**गोंदिया–** राज्य सरकारी मध्यवर्ती संघटनेचे राज्य उपाध्यक्ष आणि चतुर्थ श्रेणी गट ड सरकारी कर्मचारी महासंघाचे राज्य अध्यक्ष भाऊसाहेब पठाण यांच्यावर माजी खासदार आनंदनाव अडसुळ आणि त्याच्या गुंड प्रवृत्तीचे सहकाऱ्यांनी मंत्रालय क्रेडीट सोसायटीतील कार्यालयास शिरुन बेकायदेशीर काम करण्यास दमदाटी करुन गळा दाबुन बाटलीन मारहाण करुन प्राणघातक हल्ला केला.या घटनेचे पडसाद राज्यातील कर्मचारी संघटनामद्ये पडले असून घटनेचा निषेध नोंदवत माजी खासदार आनंदराव अडसुळ आणि त्यांच्या सहकाऱ्यांना तत्काळ अटक करुन कार्यवाही करण्याची मागणी गोंदिया जिल्हा परिषद कर्मचारी महासंघ व लिपिक वर्गीय कर्मचारी संघटनेने केली आहे.याकरीता राज्य सरकारी मध्यवती संघटनेचे सरचिटणीस लिलाधर पाथोडे यांचे नेतृत्वात जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करुन उपजिल्हाधिकारी स्मिता बेलपत्रे यांचे मार्फत मुख्यमंत्री यांना निवेदन पाठवण्यात आले. यावेळी महासंघाचे अध्यक्ष पी.जी. शहारे, शैलेश बैस, सुभाष खत्री, सौरभ अग्रवाल, कमलेश बिसेन, जिल्हा संघटक संतोष तुरकर, महासंघाच्या महिला उपाध्यक्ष कु. चित्रा ठेंगरी, अध्यक्ष तेजश्वीनी चेटुले, रमेश नागपल्लीवार लिपीक संघटनेचे अध्यक्ष संतोष तोमर,एन.यु.कावळे, अभिजीत बोपचे, आय.पी.गोमासे चतुर्थ श्रेणी कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष भगीरथ नेवारे, एन.आर. रामटेके, गुरबेले, आकाश चव्हाण, आशिष भोयर, कटरे, आदी कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते.

# आरोग्य विभागात अडीचशेवर पदे रीक्त

## आरोग्य सेवा प्रभावित : ग्रामीण भागातील आरोग्य संस्था आजारी



**गोंदिया:** गेल्या दोन वर्षांपासून कोरोना विषाणू संक्रमणाचा धोका कायम आहे. अशात देखील जिल्ह्यातील आरोग्य संस्थांमध्ये मोठ्या प्रमाणात पदे रिक्त असल्यामुळे त्याचा परिणार नागरिकांच्या उपचारावर होत आहे. अडीचशेपेक्षा जास्त पदे रिक्त असल्यामुळे आरोग्य यंत्रणाच आजारी पडली असल्याने अशात सर्वसामान्यांच्या उपचाराचे काय, असा सवाल उपस्थित होत आहे.

जिल्हा परिषद गोंदियाच्या आरोग्य विभागांतर्गत अनेक वर्षांपासून २६१ पदांची भरती करण्यात आली नाही. त्यामुळे वेळेवर रुग्णांना आरोग्य सेवा उपलब्ध होत नाही. तसेच परिसरामध्ये घाणीचे वातावरण कायम आहे. यासर्व प्रकारामुळे आरोग्य सेवा प्रभावित झाली आहे. जि.प. गोंदियाच्या आरोग्य विभागांतर्गत जिल्ह्यात ४० प्राथमिक आरोग्य केंद्र व २५८ उपकेंद्र संचालित आहेत. १३ लाखांपेक्षा अधिक नागरिकांच्या आरोग्याची जवाबदारी या शासकीय आरोग्य केंद्रांवर आहे. शासनाने रुग्णांना सेवा देण्यासाठी एक जिल्हा आरोग्य अधिकारी, एक अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी, १ पद सहायक जिल्हा आरोग्य अधिकारी, अ श्रेणीचे ७१ वैद्यकीय अधिकारी, ब श्रेणीचे ५४ आरोग्य अधिकारी, १७ आरोग्य पर्यवेक्षक, ४४ औषधी निर्माते, १७ प्रयोगशाळा वैज्ञानिक, ६४ आरोग्य सहायक, १९६ आरोग्य सेवक, ४० आरोग्य सहायका, ३६६ आरोग्य सेविका, ३ कुष्ठरोग तज्ञ व ४० स्वच्छता कामगार अश्या प्रकारे अ ते ड श्रेणीपर्यंत ९१५ पदांना मंजूरी देण्यात आली आहे. परंतु, प्रत्यक्षात ६५४ पदेच भरण्यात आली आहेत. २६१ रिक्त पदे मागील २०१६च्या आधीपासूनच रिक्त असल्यामुळे आरोग्य सेवा प्रभावित झाली आहे. सदर आरोग्य केंद्रांवर रुग्णांना वेळेवर सेवा मिळत नाही. त्यातच स्वच्छता कामगारांची पदे रिक्त असल्यामुळे अनेक ठिकाणी घाणीचे वातावरण दिसून येत आहे. या प्रकारामुळे रुग्ण आणखीच रोगी होण्याची शक्यता बळावलेली असते व काही रुग्णांची ओढ खासगी रुग्णालयांमध्ये उपचार करुन घेण्याकडे असल्याचेही दिसून येत आहे. याबाबत आरोग्य विभागाच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, सदर रिक्त पदांची माहिती वेळोवेळी विभागाला पाठविली जात आहे. परंतु, रिक्त पदे भरण्यात न आल्यामुळे आरोग्य सेवेवर परिणाम होत आहे. २०१६ पासून भरती प्रक्रिया राबविण्यात न आल्यामुळे समस्या उद्भवत असल्याचे त्यांनी सांगितले.

## अकोला येथे राज्यस्तरीय भव्य कृषी प्रदर्शनी

**गोंदिया :** डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या १२४ व्या जयंती दिनानिमीत्त दिनांक २७ ते ३१ डिसेंबर २०२२ दरम्यान अकोला येथील डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या क्रिडांगणावर राष्ट्रीय कृषी विकास योजनेअंतर्गत राज्यस्तरीय भव्य कृषी प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रदर्शनात फळबाग, भाजीपाला, फुलशेती, वनौषधी, कापुस, ज्वारी, गहू, कडधान्य तेलबिया, पाणलोट विकास, ऊस, पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय, कृषी अभियांत्रिकी इत्यादी विविध विभागाची दालने तसेच इतर संलग्न संस्था, कृषी निविष्ठा व कृषी औजारे यांची दालने सुध्दा राहणार आहे.

दिनांक २७ ते ३१ डिसेंबर २०२२ दरम्यान दररोज दुपारी २ ते ४ च्या दरम्यान शास्त्रज्ञ–शेतकरी सुसंवाद, प्रगतीशील शेतकऱ्यांचे मनोगत व मान्यवरांच्या संबोधनाचे आयोजन करण्यात येत आहे. याशिवाय शेतकरी बंधू व भगिनींचे कृषी जोडधंदे दालने या प्रदर्शनीचे मुख्य आकर्षण ठरणार आहे. या प्रदर्शनीतील कृषी पुरक व्यवसाय दालने तथा कृषी प्रक्रिया उद्योगातील दालने प्रदर्शनीस भेट देणाऱ्या शेतकऱ्यांसाठी प्रेरणादाई तसेच शेतकऱ्यांचे मनोबल उंचविण्यासाठी सहाय्यभुत ठरणार आहे.

याशिवाय गटशेती, स्वयंसहायता बचतगटांच्या यशोगाथा, महिला बचतगटांनी उत्पादित केलेले कृषी आधारीत उत्पादने, शेतकऱ्यांनी तयार केलेली नाविन्यपूर्ण शेती औजारे इत्यादींची अभिनय दालने सुध्दा उपलब्ध राहणार आहेत. एकंदरीत या प्रदर्शनीत ३०० च्या जवळपास दालने उपलब्ध राहणार असून ही कृषी प्रदर्शनी राज्यातील शेतकऱ्यांसाठी एक पर्वणी ठरणार आहे.

तरी जिल्ह्यातील सर्व शेतकरी बंधू–भगिनी, कृषी उद्योजक, कृषीमाल प्रक्रिया धारक, शाळा/महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी या कृषी प्रदर्शनीला अवश्य भेट दयावी, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी हिंदुराव चव्हाण यांनी केले आहे.

# राज्यातील टीआरटीआय संस्था अजूनही मागास

- आदिवासी विद्यार्थ्यांना पीएच.डी.आर्थिक मदत नाही
- विद्यार्थ्यांना संधी उपलब्ध करुन देण्यात हातआखडता

**नागपूर:** राज्यात सर्वात प्रथम आदिवासी संशोधन आणि प्रशिक्षण संस्था (टीआयटीआय) ची सुरुवात करण्यात आली. त्यानंतर पार्टी, सारथी आणि महाज्योती यासारख्या संस्थांची स्थापना झाली. विद्यार्थ्यांना सुविधा आणि प्रशिक्षणाची संधी उपलब्ध करुन देण्यात टीआयटीआय अजूनही मागास असल्याची टीका समाजातील लोक आणि विद्यार्थ्यांकडून होऊ लागली आहे.

सध्या राज्यातील विविध संशोधन आणि प्रशिक्षण संस्था यांच्यात स्पर्धा चालली आहे. या स्पर्धेत सर्व खाजगीकरण सुरु आहे. त्यातही खाजगी संस्थांना टक्केवारीच्या भरोशावर गुणवत्ता नसताना प्रशिक्षण संस्था म्हणून मान्यता देत आहे. तरी बार्टी, महाज्योती, सारथी या संस्था त्या–त्या समाजातील विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देत आहेत. यात बँक, रेल्वे, पोलीस भरती, युपीएससी, एमपीएससीच्या विविध परीक्षा नेट–सेट व इतर स्पर्धा परीक्षांचा समावेश आहे. मात्र टीआयटीआयकडून फक्त युपीएससीची तयारी दिल्लीत आणि राज्यातील काही विद्यापीठात एमपीएससी आणि युपीएससीसी तयारी करवून घेतली जात आहे. मात्र प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांची संख्या खूपच कमी आहे. त्या मानाने इतर संस्थांची संख्या जास्त आहे.

शिवाय बार्टी, सारथी, महाज्योतीतर्फे पीएचडी संशोधन विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय ३५ हजार व संशोधन करण्यासाठी प्रोत्साहन दिले जाते. त्याकडे टीआयटीआयने १९६२ पासून दुर्लक्ष केले आहे. त्यामुळे या समाजातील विद्यार्थ्यांना पीएचडी करताना मोठ्या अडचणीला सामोरे जावे लागते. गेल्या दोन वर्षांपासून पीएच.डी. फेलोशिपची मागणी होत आहे. मात्र त्याकडे दुर्लक्ष केले जात आहे. आदिवासी समाजातील विद्यार्थ्यांना संधी नाकारने म्हणजे त्यांना मागास ठेवणे हे सरकारचे एकप्रकारचे षडयंत्र असल्याची टीका समाजातून होत आहे. बार्टी, सारथी आणि महाज्योती यांच्या धर्तीवर आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था अंतर्गत अनुसूचित जमातीच्या (पीएच.डी.) संशोधन विद्यार्थ्यांना अधिछात्रवृत्ती तात्काळ लागू करावी अशी मागणी करण्यासाठी हिवाळी अधिवेशन सुरु होताच नागपुरात विद्यार्थ्यांनी साखळी उपोषणास सुरुवात केली आहे.

### टीआरआयटीकडून फेलोशिप मिळावी

**राष्ट्रीय स्तरावर केंद्रीय आदिवासी मंत्रालयाच्या वतीने राष्ट्रीय अनुसूचित जमाती अधिछात्रवृत्ती मिळते पण काही किचकट अटीमुळे महाराष्ट्रातील नगण्य अनुसूचित जमाती संशोधक विद्यार्थ्यांना त्याचा लाभ मिळतो. त्यामुळे टीआरटीआयकडून फेलोशिप मिळावी आदिवासी संशोधक विद्यार्थी कृती समितीने मागणी केली आहे.**

# सहकारी संस्थांचे अच्छे दिन केव्हा येणार?

**गोंदिया:** विना सहकार नाही उध्दार या म्हणीप्रमाणे सहकार चळवळ सुरु करण्यात आली. सहकाराच्या माध्यमातून वैयक्तिक सह सार्वजनिक आर्थिक प्रगती करण्याची संधी उपलब्ध केली जाते. या चळवळीतंर्गत सहकार संस्था उभारण्यात आल्या आहेत. मात्र या संस्था काही निवडक लोकांच्या आर्थिक प्रगतीचे साधन ठरले आहेत. तर दुसरीकडे संस्था डबघाईस येवू लागल्या आहेत. गोंदिया जिल्हयात सर्ववर्गीय १४४८ सहकारी संस्था असून यातील तब्बल ८१७ संस्था तोट्यात आहेत. तर फक्त ५३९ संस्था नफ्यात दिसून येत आहेत. यामुळे सहकारी संस्थांना अच्छे दिन केव्हा येणार? असा सवाल सर्वसामान्य सभासदांकडून उपस्थित केला जात आहे.

सहकार चळवळीतंर्गत उभारण्यात येणाऱ्या संस्था नफाच्या दृष्टीकोनातून स्थापन झालेल्या नसतता. मात्र आधुनि सहकारी तत्वानुसार नफा व आधिक्याचा न्याय वाटप करण्यावर भर देण्यात आला आहे. सभासदांच्या भाग भांडवलदार किमती व्याज म्हणजे लाभांश द्यावा हे सहकारी कायद्याने ठरवून दिले आहे.

महाराष्ट्रातील सहकारी संस्था भाग भांडवलदार १२ टक्के ते १८ टक्क्यापर्यंत सभासदांना लाभांष देवू शकतो. मात्र गोंदिया जिल्ह्यातील सहकारी संस्था लाभांष तर दूरच गेल्या अनेक वर्षापासून डबघाईस आल्या आहेत. विशेष म्हणजे, विविध कार्यकारी सहकारी संस्थांची सभासद संख्या ३ लाखाच्या घरात आहे.

प्रत्येक कर्जदार सभासदाकडून शेयर कपात केली जाते. यानुरुप प्रत्येक सभासदाकडून सहकारी संस्थाकडे जमा झालेला शेयर कोट्यावधीचा घरात आहे. मात्र या शेयरचा लेखाजोखा एकही संस्थेकडून समोर आणण्यात आला नाही.



तर दुसरीकडे संस्था तोट्यात आल्याचे सांगण्यात येत आहे. यामुळे सहकारी संस्थांना अच्छे दिन केव्हा येणार? असा प्रश्न उपस्थित होत आहे. जिल्ह्यातील एकुण विविध प्रवर्गातील १४४८ सहकारी संस्था आहेत. यातील ८१७ संस्था तोट्यात तर ८२ संस्था ना तोटा नफा अशा आहेत.

## जिल्ह्यात एकूण सहकारी संस्था

उत्पादक सहकारी संस्था–३६८
शेती प्रक्रिया संस्था–१६
औद्योगिक संस्था–४३
दुग्ध व्यवसाय संस्था–१४८
मत्स्य व्यवसाय संस्था–१३३
उपसा जलसिंचन संस्था–२
इतर उत्पादक संस्था–३२

### सामाजिक सेवा संस्था एकुण–४९८

ग्राहक भंडार संस्था–१४
गृहनिर्माण संस्था–२१
कामगार कंत्राटदार संस्था–८७
इतर सहकारी संस्था–३७६

### ९० टक्के उत्पादक सहकारी संस्थाही तोट्यात

**जिल्ह्यात एकुण ३६९ उत्पादक सहकारी संस्था आहेत. या संस्थांचे ३४ हजार १२ सभासद संख्या आहे. या संस्थांचे भाग भांडवल ४ कोटी १८ लाख ५ हजार एवढे आहे. मात्र ३६८ पैकी ३२५ संस्था तोट्यामुळे डबघाईस आल्या आहेत. फक्त ४३ संस्थांचे व्यवहार सुव्यस्थित आहे.**

### दुग्ध संस्थांचे अस्तित्व धोक्यात

**सहकार क्षेत्रात विविध कार्यकारी संस्था, दुग्ध संस्था, कृषी संस्था व औद्योगिक संस्था महत्वाच्या मानल्या जातात. मात्र गोंदिया जिल्ह्यात एकुण १४८ दुग्ध व्यवसाय संस्था आहेत. या संस्थांचे ७१७० सभासद संख्या आहे. मात्र सर्वच्या सर्व संस्था तोट्यात आल्या आहेत. यामुळे या दुग्ध सहकारी संस्थांचे अस्तित्व धोक्यात आले आहे. या संस्थेचे खेळते भांडवल २ कोटी १ लाख एवढे आहे.**

## संपादकीय

### ग्रामपंचायतींचा कल; पुन्हा एकदा भाजपच नंबर वन

लोकसभा, विधानसभा किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत कोणत्या पक्षाला किती यश मिळाले त्याची आकडेवारी निवडणूक आयोगाकडे असते. या आकडेवारीवरुन त्या पक्षाची राजकीय ताकद किती, हे सांगता येते. मात्र ग्रामपंचायतींच्या निवडणुका या पक्षाच्या चिन्हावर लढविल्या जात नाहीत. त्यामुळे कोणत्या पक्षाचे किती सदस्य ग्रामपंचायतीत निवडून आले, हे अधिकृतपणे सांगता येत नसले तरी, प्रत्येक गावात पक्षाचा कार्यकर्ता आणि पदाधिकारी असतो. तो ज्या ठिकाणी प्रचारात उतरतो आणि तो सदस्य जिंकून येतो. त्यातून सर्वसाधारणपणे संबंधित पक्षाकडून आपलाच उमेदवार विजयी झाला असा दावा केला जातो. निवडणूक आयोगाच्या अधिकृत निकालपत्रात कोणत्याही पक्षाचा उल्लेख नसला तरी, ग्रामपंचायतींच्या निवडणुकीच्या निकालानंतर जो राजकीय धुरळा मंगळवारी उडाला, त्यातून प्रत्येक राजकीय पक्षाकडून आपल्याला किती यश मिळाले, हे सांगण्याचा प्रयत्न केला आहे. या यशातही पुन्हा एकदा महाराष्ट्राच्या राजकारणात भाजप नंबर वन ठरला आहे.

महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यांत कमळ फुलल्याचा आनंद कार्यकर्त्यांत ओसंडून वाहत होता. त्याचे कारण महाराष्ट्रात ७,७५१ ग्रामपंचायती आणि थेट सरपंचपदासाठी निवडणुका जाहीर झाल्या होत्या, त्यापैकी काही ठिकाणी बिनविरोध झाल्या. तर भाजप–२२४१, शिंदे गट–७७२, ठाकरे गट–६६८, राष्ट्रवादी–१५१२, काँग्रेस–१०३८ या ग्रामपंचायतींमध्ये या पक्षाची सत्ता आली आहे. गाव पॅनेल आणि इतर मिळून १२५५ ग्रामपंचायतींत पक्षविरहित कारभार करण्यात येत आहे. ग्रामपंचायती निकालाचे विश्लेषण केल्यास, पुन्हा एकदा भाजप हाच महाराष्ट्रातील मोठा पक्ष ठरला आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्यातील भाजप–बाळासाहेबांची शिवसेना युतीचे सरकार पाच महिन्यांपूर्वी सत्तेवर आल्यानंतर झालेल्या ग्रामपंचायत निवडणुकीत पुन्हा एकदा मतदारांनी युतीला कौल दिला आहे. तसेच विरोधी पक्षांच्या एकत्रित संख्येपेक्षा अधिक सरपंच भाजप–बाळासाहेबांची शिवसेना युतीचे निवडून आले आहेत. सत्तांतरानंतर यापूर्वी झालेल्या ग्रामपंचायत निवडणुकीतही मतदारांनी युतीला पसंती दिली आहे. या निकालामुळे गेल्या चार–पाच महिन्यांत भाजप आणि शिंदे यांच्या गटावर करण्यात आलेल्या विरोधकांच्या आरोपाकडे मतदारांनी कानाडोळा केल्याचे दिसून आले आहे. सर्वोच्च न्यायालयात ठाकरे गट आणि शिंदे गट यांच्यातील याचिका घटनापीठाकडे प्रलंबित असल्याने राज्यातील विद्यमान सरकार घटनाबाह्य आहे, असे हिणवण्यात आले आहे. राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांच्यावरुन विरोधकांनी भाजपला कोंडीत पकडण्याचा प्रयत्न केला. महाराष्ट्रातील उद्योग गुजरातला पळविले या आरोपांची राळ उठवून विरोधकांनी भाजपला महाराष्ट्रद्रोही ठरविण्याचा केविलवाणा प्रयत्न केला. भ्रष्टाचार करणाऱ्यांवर कारवाई झाली. नवाब मलिक आणि अनिल देशमुख हे मंत्री जेलमध्ये गेले तरीही, चोराच्या उलट्या बोंबा विरोधकांनी मारत भाजपला ईडी सरकारच्या नावाने बोलून जनतेमध्ये खराब ईमेज करण्याचा प्रयत्न झाला.

एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली सरकार आल्यानंतर ५० खोके एकदम ओकेच्या घोषणा देऊन सर्वसामान्य व्यक्तीपर्यंत बिंबविण्याचा प्रयत्न राज्यातील महाविकास आघाडी सरकारच्या वतीने करण्यात आले. महाविकास आघाडीच्या वतीने राज्यपाल कोश्यारी यांच्या राजीनाम्याच्या मागणीसह इतर मागण्यांसाठी मुंबईत महामोर्चा काढला होता. हा मोर्चा संयुक्त महाराष्ट्र निर्मितीच्या वेळी झालेल्या चळवळीतील मोर्चाप्रमाणे विशाल होईल, अशा वल्गना केल्या होत्या; परंतु या मोर्चाकडे राज्यातील जनतेने पाठ फिरवल्यामुळे महाविकास आघाडीचा फज्जा उडाला होता. खरं तर तेव्हाच कल्पना आली होती की, ग्रामपंचायतीच्या निकालात भाजप बाजी मारणार आहे म्हणून. ग्रामपंचायतींच्या निवडणुकांमध्ये जनतेवर तेथील स्थानिक पदाधिकाऱ्यांचा जेवढा विश्वास तोच पक्ष निकालात बाजी मारतो हे पुन्हा एकदा दिसून आल्याने भाजपची नाळ ही ग्रामीण भागातील जनतेशी आजही जुळलेली आहे, हे सिद्ध झाले आहे. दुसरीकडे गॅस सिलिंडर बाराशेच्या वर गेला आहे. महागाई वाढली आहे, बेरोजगारी वाढली आहे, अशा अनेक मुद्द्यांवर विरोधी पक्षांकडून प्रचारसभेतून भर देत भाजपला टार्गेट करण्याचा प्रयत्न केला.

तरीही महाराष्ट्रातील तळागाळातील मराठी मतदारांनी भाजपच्या पाठीशी ठामपणे उभे राहण्याचा निर्णय घेतला आहे. हे या निकालातून दिसून येते. तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देश विकासाच्या मार्गावर वेगाने पुढे जात असताना आता महाराष्ट्रातही त्यांच्या विचारांच्या सरकारचे काम राज्यातील जनतेला पसंत पडले आहे, हे सांगायला कोणा ज्योतिषाची गरज नाही. ज्या पद्धतीने राज्यातील ग्रामीण जनतेने ग्रामपंचायत निवडणुकीत शिंदे–फडणवीस सरकारला पसंती दिली आहे, त्याच पद्धतीने आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीतही युती विजयी होईल यात शंका वाटत नाही. तसेच महानगरपालिका, नगरपालिका निवडणुकीत शहरी मतदारही भाजप–बाळासाहेबांची शिवसेना युतीला कौल देईल, याची खात्री आहे.

## समन्वयातून सर्वांगिक विकास साध्य करावा- माजी आ. जैन




**तिरोडा,** प्रत्येक गावपातळीवर काम करत असताना अनेक अडचणी येतात. परंतु,सरपंच व सदस्य यांनी आपसात समन्वयातून गावाचा सर्वांगिक विकास साधून विकासाकडे वाटचाल करावी असे आवाहन माजी आमदार राजेंद्र जैन केले. तिरोडा शहर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने कुंभारे लॉनमध्ये तालुक्यातील ग्रामपंचायतच्या नुकत्याच पार पडलेल्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या समर्थित निवडून आलेल्या सरपंच व सदस्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी ते बोलत होते.

कार्यक्रमाला डॉ अविनाश जायस्वाल, नरेश कुंभारे, अजय गौर, जिब्राईल पठान, राजेश गुणेरिया, राजलक्ष्मी तुरकर,रविकांत बोपचे, प्रेमकुमार रहांगडाले, योगेंद्र भगत, मनोज डोंगरे, कैलास पटले, जगदीश बावणथळे, किरण पारधी, नीता रहांगडाले, वाय. टी. कटरे,जया धावडे, सविता पटले, संध्या गजभिये, डॉ. संदीप मेश्राम, रिता पटले आदी उपस्थित होते.ते दरम्यान, खासदार प्रफुल पटेल यांच्या नेतृत्वात निवडून आलेल्या सर्व नवनिर्वाचित सरपंच व सदस्यांचे अभिनंदन करून माजी आमदार राजेंद्र जैनजै यांनी जनतेचे आभार मानले. याप्रसंगी नवनिर्वाचित सरपंच व सदस्यांचा सत्कार करण्यात आला. प्रसंगी खासदार प्रफुल्ल पटेल यांच्या नेतृत्वात विश्वास ठेवून ईश्वर रहांगडाले यांच्यासह तालुक्यातील कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला.

### डॉ. पंजाबराव देशमुख यांना मुख्यमत्र्याकंडून अभिवादन

नागपूर: डॉ. पंजाबराव देशमुख ऊर्फ भाऊसाहेब देशमुख यांच्या जयंतीनिमित्त मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.येथील शासकीय निवासस्थान रामगिरी येथे झालेल्या या कार्यक्रमाला मंत्री दीपक केसरकर, खासदार सर्वश्री प्रतापराव जाधव, कृपाल तुमाने, भावना गवळी, आमदार कृष्णा खोपडे व इतर मान्यवर उपस्थित होते.

**स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ८०८०८१५३२९ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)**

# करजगार परिसरातील सत्यशोधक चळवळ

**सामाजिक चळवळ:** प्रचलीत समाज व्यवस्थेचा किंवा संस्कृतीचा किमान काही भाग बदलण्यासाठी अनेक व्यक्ती एकत्र येऊन संघटीत प्रयत्न करतात तेव्हा त्या प्रयत्नास सामाजिक चळवळ म्हणतात. उत्कट व सार्वजनिक गरजेतून चळवळी निर्माण होतात. अशा चळवळीत सामील होण्याच्या व्यक्तीची काही मुल्यांशी ध्येयवादाशी बांधीलकी असते. आपली ध्येय उद्दिष्टे साध्य करण्याच्या दृष्टीने वापरावयाची साधने, धोरणांची आखणी व डावपेच विषय काही काळ का होईना या विषयी एकमत असते. त्यामुळे निश्चित ध्येय–उद्दिष्टे डोळ्यासमोर ठेवून काम करणारा व्यक्तींचा एक गट म्हणून समाजामध्ये त्याला अस्तित्व व अस्मिता लाभते. चळवळ जसजशी रुजते व वाढू लागते तसतसे चळवळीत काम करणाऱ्या व्यक्तीत दृढता येते. कोणत्याही सामाजिक वळवळीला ङ्गजैसे थेफ अवस्था नको असते. तर समाजाच्या सद्यस्थितीत बदल घडवून आणणे हे काम सामाजिक चळवळीच करीत असतात.

**सत्यशोधक चळवळ:** या दृष्टीने बघता सत्यशोधक चळवळ ही सामाजिक चळवळ ठरते. सत्यशोधक चळवळ ही गतीशील व परिवर्तनवादी सामाजिक चळवळ होती. या चळवळीने सामाजिक, धार्मिक, सांस्कृतीक व राजकीय परिवर्तन घडून आणले. एक मोठा लढा महाराष्ट्रात उभा केला.

ज्यावेळी ब्राम्हो समाज, प्रार्थना समाज व परमहंस सभा या सामाजिक चळवळी कार्यरत होत्या. त्याच काळात सत्यशोधक चळवळ महात्मा जोतीराव फुले व त्यांच्या सहकाऱ्यांनी स्थापन केली. वरील तीनही समाज उच्चवर्णी यांच्या पुरते मर्यादित राहिले. तर सत्यशोधक समाज चळवळ शहरी तसेच ग्रामीण भागात मुसंडी मारीत गाव खेड्यात शैक्षणिक व सामाजिक परिवर्तनाची नांदी ठरली. सुरुवातीला पुणे, मुंबई, सातारा परिसरात आपले पाय रोवले.

**विदर्भात प्रवेश:** पुणे–मुंबई–सातारा परिसरातील हीच चळवळ महात्मा ज्योतीराव फुले यांच्या निधनानंतर मात्र त्यांच्या तळमळीच्या जीवापाड सहकारी मित्रांनी ग्रामीण भागात पोहोचवली. आपला प्रदेश सोडून कोसो दूर प्रवास करुन विदर्भात पोहोचली. विदर्भाच्या मातीत या चळवळीचे मुळ दोन गृहस्थांमुळे रुजले. त्यामध्ये नारो बाबाजी महाधट पानसरे (साळूंखे) आणि दुसरे धर्माजी रामजी डुंबरे पाटील जुन्नर तालुक्यातील ओतूरचे हे महात्मा जोतीराव फुलेंचे तरुण सहकारी १९०० साली वऱ्हाडात आले. या दोघांना त्यांच्या वेदोक्त आणि पुराणोक्त विधीच्या अभ्यासामुळे शास्त्री म्हटले जात असे.

**करजगावात सत्यशोधक समाजाची शाखा:** नाशीक,मालेगाव,धुळे, चाळी–सगाव, भुसावळ,माटरगाव इत्यादी गावे फिरुन अमरावती जिल्ह्यात आले. करजगावला माळी लोकांची वस्ती जास्त आहे. शास्त्रीबुवांनी त्यांना समाजाचे शिक्षण देवून त्यांच्यात समाजाची जागृती केली. (वेदोक्त आणि पुराणोक्त लेखक नारोबाबा महाधट) करजगावात लक्ष्मण शास्त्री सोनार यांच्या वाड्यात त्यांनी सभा घेऊन वऱ्हाड प्रांतातील पहिली सत्यशोधक समाजाची शाखा स्थापन केली. हे करीत असताना नारोबाबा यांना ब्राम्हण अधिकाऱ्याकडून फार त्रास सहन करावा लागला. एखादया मराठा गृहस्थात शास्त्री नाव धारण करणे ब्रम्हवृंदास पटत नव्हते. म्हणून त्यांना परतवाडा येथे ब्राम्हण अधिकारी असल्याने त्याने ब्राम्हणास उत्तेजन देऊन महाधट यांचा छळ केला. ते धोबी–वठ्ठी आहेत असा प्रचार केला. धाकद पटशा दाखविला. त्यांना लबाड गुन्हेगार ठरविण्यापर्यंत मजल गेली. परंतु पुण्याच्या कलेक्टर साहेबांनी पोलीस चौकशी करुन लोकांचा खोडसाळ अपप्रचार थांबविला. महाधट शास्त्री यांनी सेंदूरजना, चांदुर, वाठोडा वगैरे गावी सभा घेऊन सत्यशोधक समाज स्थापन केला. ठिकठिकाणी वैदिक शाळा काढून ब्राम्हणोत्तर मुलांस शिक्षण देऊन पुरांहिताचे काम शिकविले. १९०० ते १९१८ पर्यंत अमरावती, अकोला, बुलढाणा व यवतमाळ तसेच नागपूर जिल्ह्यात पुरोहित तयार केले. शेकडो सभा घेतल्या. करजगावच्या परिसरात बेलोरा, चांदूररेल्वे परिसरातील नायगाव, बाळापूर तालुक्यातील वाडेगाव, पातुर यवतमाळ जिल्ह्यात नायगाव आणि वर्धा जिल्ह्यात वडगांव अशी सत्यशोधक केंद्र उभारल्या गेली. प्रस्तुत लेखाच्या निमित्ताने आ–पणास करजगाव, शिरजगाव कसबा, शिरजगाव बंड, बेलुरा, वणी, रिद्धपूर, राजनापूर्णा, बोपापूर या करजगावच्या आसपास असणाऱ्या गावातील सत्यशोधक चळवळीचा थोडक्यात आढावा घ्यावयाचा आहे. यावरुन सत्यशोधक चळवळीला ग्रामीण भागात पोहोचलेली पहिली चळवळ. शेतकऱ्यांच्या शोषणा विरुद्ध लढणारी चळवळ, शैक्षणिक व सामाजिक, धार्मिक, राजकीय परिवर्तनवादी चळवळ का म्हटल्या जाते याची कल्पना येईल.

**सत्यशोधकी साहीत्य:** ही चळवळ करीत असताना, सत्यशोधक कार्यकर्त्यांनी सत्यशोधकी वाडमय निर्मिती सुद्धा केली. महात्मा जोतीराव फुलेंच्या लेखनाची परंपरा ग्रामीण भागा–तील सत्यशोधक कार्यकर्त्यांनी पुढे चालविली. सत्यशोधक चळवळीचा प्रचार–प्रसार परिषदा, सभा संमेलनातून करण्यात आला. सत्यशोधक कार्यकर्ते अल्पशिक्षीत आणि शेतकरी वर्गातील होती. ही मंडळी अल्पशिक्षकीत खेडूत असली तरी त्यांचा दृष्टीकोन व्यापक आणि मानवतावादी होता. सावकार, शेटजी भटजीचत्र्या विरुद्ध त्यांच्या शोषण वृत्तीच्या विरुद्ध सत्यशोधकांनी प्रत्यक्ष जीवघेणा संघर्ष केला. हा संघर्ष त्यांनी आपल्याला जमेल, रुचेल पचेल अशा बोली भाषेतून व्यक्त केला.

त्यासाठी त्यांनी कविता, कथा, नाटक, निबंध, गवळण,छक्कड,पद, अभंग,जलसा, विडंबन अशा विविध रुपबंधाचा वापर केला. या लेखकांनी निर्माण केलेल्या वाडमयामुळे छोट्या खेड्यागावात धार्मिक गुलामगिरी व विरुद्ध संघर्ष करण्याची प्रेरणा समाजन्ययनामध्ये निर्माण झाली. सत्यशोधकांनी स्वत: पदरमोड करुन प्रकाशात संस्था, छापखाने, बुकडेपो, वर्तमानपत्रे, नियमकालिके चालविली. आर्थिक आतबट्टयाचा धंदा केला. शेती विकली, घरातील दाग दागिने विकले. प्रसंगी गहाण ठेवले. याचेच उदाहरणे करजगाव व बेलुरा येथे दिसून येतात. त्यांचा संघर्ष शब्दात मांडणे कठीण आहे. अशा सत्यशोधकाची व त्याच्या साहीत्याची तोंड ओळख मराठी साहित्याने करुन दिली नाही. ती करुन घेण्याचा प्रयत्न या लेखाच्या निमित्ताने केला जाईल.

**करजगावात कृष्णराव भालेकर:** नारोबाबा महाधट व धर्माजी रामजी डुंबरे हे दोन्ही शास्त्री करजगावातून गेल्यानंतर कृष्णराव भालेकर यांचे येथे आगमन झाले. कृष्णराव भालेकर महात्मा जोतीराव फुले यांचे तरुण सहकारी होते. त्या दोघांच्या कार्यपद्धतीत फरक होता. त्यामुळे मतभेदही होते. असे असले तरी कृष्णराव भालेकर यांनी सत्यशोधक चळवळीशी आ–पले नाते दृढ ठेवले होते. किंबहूना त्यांनी सत्यशोधक चळवळीच्या प्रचार–प्रसारासाठी आपले आयुष्य भटकंतीत घालविले.

करजगाव येथे त्यांनी दोन महत्वाची व्याख्याने दिली होती. त्यामध्ये एक धर्म विषयक तर दुसरे व्याख्यान लहान गरीब शेतकऱ्यांनी एकत्र येवून त्यांच्या शेतामालाशी संबंधित असे कारखाने काढण्याबाबत होते. कारखाने आणि व्यापार चालविणारी शेतकरी मंडळी या नावाची संस्था स्थापन व्हावी म्हणून करजगार येथे तारीख १८ व २८ सप्टेंबर १९०२ रोजी भरलेल्या जाहीर सभेत कृष्णराव भालेकर यांची भाषणे झाली होती.

त्या जाहीर सभेत त्यांनी शेतकऱ्यांची स्थिती दिवसेंदिवस वाईट होत चालली आहे. त्यास अज्ञान कारणीभूत आहे. त्यावर उपाय म्हणून विद्या आणि उद्य–ोग यांचे मिश्रण करुन त्यावर उपाय शोधून रामबाण औषध काढणे आवश्यक आहे. हे नमुद करुन दी करजगाव इंटस्ट्रियल ॲड कमर्शिअल ॲग्रीकल्चररिस्ट कंपनी असावी असे त्यांनी येथे कारखाने आणि व्यापार चालविणारी शेतकरी मंडळी स्थापन करण्याचे सांगितले. मदतीकरिता त्यांनी मुंबईहून काशिनाथजी देवजी यांनाही पुर्वीच्या सभेत आणले होते. या सभेत भालेकरांच्या सु–चना पसंत वाटून काही मंडळीनी प्रतिक्रीया व्यक्त केल्या. त्यामध्ये राजारामजी भगवानजी डवरे प्रांत सेक्रेटरी स.शो. समाज बेलोरा, तातोबा बाबुराव इंगिलीश टिचर करजगाव, कृष्णाजी कर्काजी चौधरी सेक्रेटरी स.शो.समाज करजगाव, काशीनाथजी देवजी धूस चिप इन्स्पेक्टर मुंबई कृष्णाजी तानाजी चौधरी सदाशिव रामजी, भगवंत बाजाली कांडरकर, शंकरराव बालाजी पाटील, अमृतराव निंबकर, श्यामजी गंभीरजी चरजन आणि शे–षराव रामराव देशमुख सर्व करजगाव यावेळी कंपनीचे भाग भांडवलदार होते. ३९ हजार १९० रुपयाचे भाग घेतलेले व वचन दिलेले ५२ अन्य नावे आढळतात हा रिपोर्ट १ जानेवारी १९०३ ला जबलपूर सी.पी. येथे हरीशंकर दाद–ाजी कवळे बी.ए. जबलपूर यांनी लिहीला होता. (भालेकर समग्र वाडमय संपादक सिताराम रायकर पृ.१६०,१६२,१६३)




**करजगावात सावित्रीबाई फुलेच्या काव्यसंग्रहाचे प्रकाशन:** बावनकशी सुबोध रत्नाकर हा सावित्रीबाईचा उपलब्ध झा–लेला दुसरा काव्य संग्रह दोन. पुस्तकाच्या मुखपृष्ठावर मजकूर पुढीलप्रमाणे आहे. हे पुस्तक मयत महात्मा ज्योतीबा फुले यांच्या पत्नी सावित्रीबाई फुले यांनी रचले व ते शास्त्री बाबा, चौधरी, महाजन, वरूड व शास्त्री गोविंदस्वामी मोर्शी यांनी वनशेद्रकर राजे भोसले यांचे कडून मदत घेवून मुंबई येथील ओरिएंटल छापखाना येथे छापून सत्यशोधक समाजाचे स्वामी लक्ष्मण शास्त्री सोनार, करजगांव (करजगाव) यांच्या घरी प्रसिद्ध केले असे (आवृत्ती १ ली, ७ नोव्हेंबर १८९२ किंमत २ ढबू पैसे (क्रांतीज्योती सावित्रीबाई जोतीराव फुले, डॉ.मा.गो.माळी,पृ.८२) १८९० साली जोतीरावांच्या मृत्यूनंतर ही रचना झाली असून पुस्तक रुपये १८९२ मध्ये यास प्रसिद्धी मिळाली आहे. वरील मजकुरावरुन स्पष्ट होते की, सत्यशोधक समाजाची शाखा करजगावात जरी १९०० झाली असली तरी तिचे लोण या ठिकाणी १८८२ ला पोहा–चले होते. लक्ष्मणशास्त्री सोनार यांच्या घराच्या दरवाजावर आजही “लक्ष्मण भूवन' असे शब्द कोरले आहे. येथेच प्रकाशन झाल्याचे प्रस्तुत मजकुरावरुन दिसते. (करजगावातील सत्यशोधक चळवळ, सतीश जामोदकर, पृ.क्र.४) करजगावात भीमपुराण, सत्यशोधक समाज स्थापन झाल्यापासून त्या समाजाचे अनुयायी झालेले भीमराव विठ्ठल महामुनी यांचे जलश्याप्रयोग करजगावात दि.३ व ४ एप्रिल १९०६ रोजी झाले. त्यांचा सत्योपदेश भीमराव महामुनी व त्यांचे साथीदार रा. गोविंदराव बाळाजी जाधव यांनी करजगावकर मंडळींना केला. त्यामुळे ब्राहमणेत्तर मागासलेला समाज खडबडून सावध होऊन त्यांच्या तोंडातून ब्राम्हनांनी बुडविले. सावकारांनी नाडले, कामदाराने लुटले हे उद्गार बाहेर पडू लागले. त्यांचे अभिनंदन करणारे सर्टिफिकेट करजगाव शाखेच्यावतीने मोतीराम तुकाराम वानखडे, कृष्णा करकाजी चौधरी व गंगाराम बालाजी गणोरकर यांनी दिले होते. (विद्या प्रकाश, भीमराव महामुनी, आ.२ री १९११, पृ.)

**करजागवात सत्योदयचे प्रकाशन:** करजगावात सत्यशोधक मंडळींना एक चर्चा मंडळ स्थापन केले. त्यानंतर एक लायबरी काढली व नंतर सत्योदय नावाचे सत्यशोधक मताचे पत्रही प्रकाशित केले. यासाठी कृष्णजी कर्काजी चौधरी यांनी सूचना मांडली व केशवराव कांडलकर, शंकरराव पाटील म्हणाला यांनी ती उचलून धरली. विमल नावाचा छोटासा छापखाना केशवराव कांडलकर यांच्या माडीवर टाकण्यात आला. त्यामध्ये शंकरराव पाटील व मोतीराम वानखडे हे काम पाहत. यापत्रात भास्करराव जाधव, नवलकर, मुकुंदराव पाटील, रेवरंड टिळक, महर्षि विठ्ठल रामजी शिंदे, कर्मवीर भाऊराव पाटील, इत्यादी थोर मंडळीचे लेख प्रकाशित होत होते. सत्योदयाचा प्रचार–प्रसार झाला. परंतु पुढे दुसऱ्या महायुद्धामुळे खर्च वाढला आणि वर्गणीदार घटले. त्यामुळे ५–६ वर्षानंतर तो बंद पडला. (श्री. शंकरराव शिक्षण संस्था, करजगाव, हीरक महोत्सव स्मरणिका १९८०) करजगाव येथून सत्योदय हे मासिक स्वरूपात प्रकाशित होत होते. कृष्णाजी कर्काजी चौधरी हे संपादक होते.

सत्योदय पहिला अंक जाने १९९५ मध्ये प्रकाशित झाला. या अंकात १६ पृष्ठे होती. असे दाते यांच्या ग्रंथसुची नियमकालीकांची यावरुन प्रा. अरुण शिन्दे यांनी सत्यशोधकीय नियमकालिके ग्रंथामध्ये म्हटले आहे. मराठी नियमकालीकांची सूचि तृतीय खंड पृ.३२,विशेष पुरवणी, या ग्रंथात पुर्णानंद वर्ष २, अं ७, ऑगस्ट १९१७, पृ.२९ वर अभिप्रायात म्हटले की, सदर मासिक हे भिक्षुक वर्गाला बहिष्कार घालून व ब्राम्हणांच्या आचार विचारांची निंदा करुन आपल्या सत्यशोधक समाजाची दिवटी नाच विषयाकरिता अवतरले आहे. अर्थात या अभिप्रायावरुन पूर्णानंद कोणत्या विचाराचे असावे याचा अंदाज येतो. तसेच सुबोध माला नावाचे मासिक प्रकाशित होत होते. याच पूर्णनंदमध्ये वर्ष ३ अंक २–३ फेब्रुवारी, मार्च १९१८ वर जाहीरात आहे. सुबोधमाला या मासिकाचे संपादक सुद्धा कृ.क.चौधरी असल्याचे दिसते. (म.नि.सृ.तृतीय खंड पृ.३६) पुढे अमरावती येथून के.बी.देशमुख यांनी सुबोधमाला ग्रंथ मालीका १९१५ मध्ये काढली होती, असे निदर्शनास येते. अशाप्रकारे सत्यशोधक चळवळीच्या प्रचार–प्रसार करण्यात करजगावकर मंडळी पुढे होती असे दिसते.

**करजगावात महिलांची सभा:** शनिवार २० जानेवारी १९९४ साली मकरसंक्रांती निमित्त तिसरी महिला समाजाची सभा करजगाव येथे संपन्न झाली होती. शंकरराव पाटील यांचे नेटीव लायब्ररीचे हॉलमध्ये ही सभा पार पडली. यावेळी २५० स्त्री समूह जमला होता. यावेळी मालिनीबाई वानखडे यांनी स्वागतपर भाषण केले. या सभेचे अध्यक्षस्थाव परतवाडा येथील हे डमिस्ट्री सौ.सुंदराबाई कावतकर व करजगाव येथील मुलींच्या शाळेच्या हेड मिस्ट्रेस श्रीमती गोदावरीबाई पाचपोर यांनी स्विकारले होते. यावेळी गीताबाई देशमुख यांनी लिहीता वाचता येत नसल्यामुळे होणारे तोटे, द्रोपदाबाई बोरखेडीकर यांनी पतिव्रताधर्म, अंजनाबाई देशमुख जरुडकर यांनी वाचाल, तर अध्यक्षा यांनी स्त्री शिक्षणाविषयी मते मांडली. यावेळी पुरुष मंडळी हॉलच्या बाहेर उपस्थित होती. सत्यशोधक पुरुष मंडळीच्या घरातील स्त्रिया यामध्ये हिरीरीने सहभागी होत्या. (दीनमित्र,ता.२८ जानेवारी १९१४) अशाच प्रकारची चौथी महिलांची सभा २१ जानेवारी १९९५ साली संपन्न झाली होती. यावेळी अध्यक्ष दांडेकरीन बाई व उपाध्यक्ष सुंदराबाई कावतकर व पार्वताबाई पेंडसे होत्या. श्रीमती गोदावरीबाई पाचपोर यांनी स्त्रियांचे विचार, सौ.अंजनाबाई देशमुख जरुडकर यांनी स्त्री शिक्षणाची जरुरी आणि मंजरीबाई सोनार यांनी एके ठिकाणी जमल्यापासून फायदे, अनुसयाबाई चौधरी यांनी स्त्री शिक्षण, नर्मदाबाई तांबटकर यांनी गृह कलह, तर गीताबाई देशमुख यांनी वाचन या विषयावर आपले मत मांडले होते. प्रस्तुत सभा आजच्या स्त्रीयांसाठी सुद्धा प्रेरणा देणाऱ्या आहेत. शंभरवर्षापुर्वी करजगावात कशा प्रकारच्या स्त्रीयमुक्ती चळवळी होत होत्या हे दिसून येते.

**करजगावात सत्यशोधकी साहित्याची निर्मिती:** करजगावात शाळा काढल्या गेल्या, वाचनालये काढली, छापखाने काढले, वृत्तपत्र–मतपत्रे काढली, सभा–संमेलने घेतली गेली. या सर्वाची प्रेरणा महात्मा फुलेंनी सत्यशोधक चळवळ होती. हे कार्य करीत असताना करजगावकरांनी मराठी साहित्यात मोलाची भर घा–तली. आपले विचार प्रचार–प्रसार करण्याकरिता विविध सत्यशोधकी पत्रातून स्फूट लेख लिहिले. त्याच बरोबर पुस्तकांच्या रुपाने अक्षर वाडमय निर्मिती केली. अशी साहित्य निर्मिती करणाऱ्यांमध्ये मोतीवराव तुकाराम वानखडे अग्रेसर होते. त्यांनी सतरा पुस्तके प्रकाशित केली. त्यामध्ये त्यांची स्वत:ची स्वलिखीत तर काही इतर सत्यशोधकांची लिखीत असलेली त्यांनी संपादित केली. त्याचा स्वत:चा सत्यादय छापखाना होता. काही काळ ते मराठी पुढारी या मासिकांचे संपादक होते. त्यानंतर कृष्णाजी कर्काजी चौधरी यांनी दीनबंधू व दीन मित्र मधून लेखन केले. त्यांची चार पुस्तके लिहिली. त्यामध्ये शेतकऱ्यांचे दु:खोदगार हे महात्मा जोतीराव फुलेच्या शेतकऱ्यांचे असूड याची आठवण करुन देणार आहे. कृष्णाजी कर्काजी चौधरी हे परम महासंगणकाचे जनक डॉ. विजय भटकर यांच्या आईचे वडील म्हणजे आजोबा होते. त्याचप्रमाणे अमृतराव चौधरी यांची अमृतगीता व एकनाथ चौधरी यांची विधवांचे कैवारी ही पुस्तके प्रसिद्ध होती.

**करजगावातील मंडळीचे राजकीय पुढारीपण**

सत्यशोधक चळवळीचे केंद्र असलेल्या या गावात सत्यशोधक घराण्यातून एक खासदार व एक आमदार दिला. डॉ.अ.ग.सोनार मध्यप्रांतात वऱ्हाड असताना खासदार होते. तर विनायकराव मारोतराव कोरडे हे महाराष्ट्र विधान सभेचे दोनवेळी सदस्य व काही काळ मंत्री सुद्धा होते. या दोघांचे वडील सत्यशोधकी चळवळीचे कार्यरत होते. आज करजगाव व त्याच्या आसपासचा परिसर शैक्षणिक, सामाजिक, धार्मिक, राजकीय दृष्ट्या प्रगत दिसत आहे. त्याच पाळेमुळे या ठिकाणी रुजलेल्या सत्यशोधक चळवळीतच आहे.

**शिरजगाव कसवा:** करजगाव पासून काही किमी अंतरावर अस–लेले मोठे गाव शिरजगार कसबा ही बाजारपेठ. या गावात १९९३ साली सत्यशोधक समाजाची शाखा स्थापन झाली. या शाखेचे सेक्रेटरी सीतारामजी गजमालजी येलकर हे होते. १९९४ साली शिरजगार येथील सटवाईच्या पुऱ्यात २१/०२/१९१४ रोजी सत्यशोधक समाजाची जाहीर सभा भरली होती. या सभेचे अध्यक्षस्थान सूर्यभानजी पवार करजगावकर यांनी भूषविले. यावेळी सत्यशोधक समाजाचे नियम कृष्णाजी कर्काजी चौधरी यांनी सांगितले. तर उदेभानजी सावरकर यांनी सर्वच जर लिहिणारे झालो तर शेतकी कोण करील? या आक्षेपाचे खंडन करणारा निबंधन वाचला. मोतीराम वानखडे यांनी ईश्वर आणि मनुष्य यांचे मध्ये दलाल नसावा. या विषयावर व्याख्यान दिले. कृष्णाजी चौधरी यांनी नरदेहाचे सार्थक या विषयावर व्याख्यान दिले. (दिनमित्र, ४ मार्च १९१४) १९१८ साली शिरजगाव येथे सत्यशोधक समाजाच्या प्रेरणेने बारी समाजोत्कर्ष सभा संपन्न झाली. शिरजगाव येथील माळी समाजाच्या मंडळींनी १/१०/१९२१ रोजी वाचनाल स्थापन केले. या वाचनालयाचे अध्यक्ष वनदेंवबुवा वैद्य होते. तर सेक्रेटरी नारायणराव सोनार होते. १०/१०/१९३० साली शिरजगाव येथे बहुजन समाज लायब्ररीच्या विषयाने सत्यशोधक ब्राहमणेत्तर पक्षाच्या कार्यकारी मंडळीच्या सभेचे अध्यक्षस्थान गणपतराव हिरामणजी भोंडे यांनी स्वीकारले होते. त्यावेळी तीन ठराव करण्यात आले होते. त्यावेळी मोतीरामजी सावकर, किसनराव तडस, नारायणराव गणपतराव रसे, सितारामजी येलकर, वनदेवबाबा वैध, नारायणरावजी बोडके, चंपतराव बोडखे, चंद्रकांत गायकवाड, भिवा गायकवाड, तुकारामजी मातकुले, दशरथ जानराव असवार रा. अचलपूर इत्यादी मंडळी उपस्थित होती. (दीनमित्र, १२ नोव्हेंबर १९३०)

**बेलुऱ्यातील सत्यशोधक चळवळ:** बेलुरा यागावी १९०१ नंतर सत्यशोधक समाज स्थापन झाला. करजगावी सत्यशोधक समाज स्थापन केल्यास नारोबाबा महाधट व धर्माजी रामजी डुंबरे पाटील बेल–ुरा येथे गेले. त्यांनी छापून प्रसिद्ध केलेल्या सत्यशोधक समाज जाहिर खबर या धोटेखानी पुस्तिकेत सदर शाखेचा उल्लेख आहे. पुजा पद्धती भाग दोन ही पुस्तीका बेलुरा येथील सत्यशोधक यशवंतराव खुशालराव देशमुख यांना या दोन्ही शास्त्रींनी अर्पण केले आहे. यशवंतराव देशमुख येथील सत्यशोधक शाखेचे अध्यक्ष होते. या शाखेचे सर्वात मोठे कार्य म्हणजे ब्राहमणांस हक्क नाही या करीता दिलेला कोर्ट कचेऱ्या माध्यमातून केलेला संघर्ष, हा महाभियोग १९०२ साली मोर्शीच्या दिवाणी कोर्टात मुकदमा नं.८३० चा, रुपये ९७ चा दावा म्हणून ओळखला गेला. जनार्दन नारायण भट जोशी यांनी यशवंतराव खुशालराव देशमुख, राजारामजी भगवानजी डवरे, हरीभाऊ गोपी, महानुभाव, कृष्णाजी सोनाजी माळी उन्नाजी, श्रावणजी, जाणूजी यांच्या विरुद्ध लग्नकार्यातील दक्षिणे संबंधी ब्राहमणांच्या हक्का संबंधी होता. या खटल्याचा निकाल मोर्शी कोर्टाने जोशी यांचे कडून तर नंतर अमरावती डिस्ट्रीक्ट कोर्टाने प्रतिवादी कडून नागपूर हाय कोर्टाने पुन्हा प्रतिवादी कडून दिला. हा सत्यशोधकांचा मोठा विजय होता. हा खटला जे वे ब्याटन ज्यु डिशीअल कमिशनर मध्यप्रांत, वऱ्हाड भाग यांच्या कोर्टाने सेकंड अपील नं.१२६, सन १९०६ चा निकाल १३ एप्रिल १९०७ रोजी दिला. बेलुरा येथे विहिरीतून पाणी खेचण्याचा पंप कार्यान्वित करण्याची कृष्णराव भाटेकरांची खटपट १९०५ साली बेलुरा येथे यशवंतराव देशमुख यांच्या शेतात सुरु केली होती. १ जानेवारी १९०५ साली भीमपुराणला हे भीमराव महामुनी यांच्या जलाशयाचे प्रयोग येथे आले होते. त्यासाठी भीमराव महामुनी यांना या शाखेचे प्रबोधन व लोकजागृती केल्याबद्दल प्रशस्ती पत्र दिले होते. यशवंतराव बापूंनी सत्यशोधक समाज पुष्प १ ले देशोद्धार हे काव्य पुस्तिका लिहिली होती. त्यास बकाराम पाटील वणीकर यांची प्रस्तावना आहे. बेलुऱ्यात दोन जलशाची निर्मिती झाली होती. एक नथ्थुजी खोंड विधाते व गुलाबराव चौधरी यांचा तर दुसरा उत्तमराव कडू यांचा १९११ पासून सुरु झालेल्या सत्यशोधक परिषदांमध्ये यशवंतराव बापू उपस्थित राहत होते. यशवंतराव बापू शिवाय, राजरामजी भगवानजी डवरे, शंकराव विधाते, नथुजी खोंड, अजाबराव राऊत, चंपतराव यशवंतराव डवरे, आनंदराव लढके व नलीनीताई लढके हे सत्यशोधक चळवळीत कार्य करीत होते. या गावातील बी.टी. देशमुख चार वेळा अमरावती पदवीधर मतदारसंघातून विधान परिषदेत प्रतिनिधीत्व करीत होते. तर विद्यमान मंत्री बच्चू कडू अचलपूर मतदारसंघातून विधानसभेत चौथ्यांदा प्रतिनिधीत्व करीत आहेत. ते सुद्धा याच गा–वचे आहे.

रिध्दपूर येथे सत्यशोधक समाज परिषद: महानुभवांचे पवित्र स्थळ म्हणजे रिध्दपूर हे बेलुऱ्यापासून ३–४ कि.मी.अंतरावर असून या ठिकाणी १५/०४/१९३० रोजी सत्यशोधक परिषद बकाराम कृष्णाजी पाटील वणीकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली होती. या परिषदेत अस्पृश्यता सरकारने बंद करावा. सर्व विधी स्वत: करावे वर्ण व्यवस्था ही खुळचट आहे असे ठराव करण्यात आला. याचा वृत्तांत बापुराव बाजीराव विधाते बेलुरा यांनी दीनमित्राला पाठविला होता. (दिनमित्र ता.१४ मे १९३०).

शिरजगाव बंड: करजगाव परिसरातील आणखी एक गाव म्हणजे शिरजगार बंड, या ठिकाणची मंडळी महानुभाव पंथाच्या विचार सरणीची, परंतु पुढे ते सत्यशोधक चळवळीत कार्य करीत होती. या ठिकाणी ४ जुलै १९२८ रोजी महानुभाव परिषद भरली होती. या परिषदेचे सेक्रेटरी बकाराम कृष्णाजी पाटील हे सत्यशोधक होते. त्यांनी तत्कालीन महानुभवांच्या भ्रष्ट आ–चारावर कठोर टीका केली होती. येथील काशीराव बापु देशमुख क्षत्रियांचा इतिहास लिहिला, त्यांनी सुबोधमाला ग्रंथमाला काढली १२ पुस्तके लिहिली. कित्येक सत्यशोधकाची पुस्तके प्रकाशित केली. ते अकोला, अमरवती येथील सत्यशोधक परिषदांना उपस्थित होते. ह.ना.नवलकर यांनी सत्यशोधक महासाधू श्री तुकाराम महाराज हा ग्रंथ १९२९ मध्ये काशीराव बापु यांना अर्पण केला येथील दादासाहेब तडस हे सुद्धा सत्यशोधकची विचारांचे गृहस्थ होते. त्यांनी विदर्भ क्षत्रिय मराठी शिक्षण संस्थेचे अध्यक्षपद भूषविले होते. येथील वसुधाताई देशमुख यांनी अचलपूर मतदार संघाचे दोनवेळा विधान सभेत प्रतिनिधीत्व केले. त्या काही काळ राज्यमंत्री होत्या.

राजना पूर्णा: करजागव पासून विस किमी अंतरावर असलेल्या गावात १४ डिसेंबर १९२१ साली सीतारामजी सोन–ाजी पाटील जामोदकार यांच्या घरी सत्यसमाज मताप्रमाणे ब्राहमनाशिवाय सत्यनारायण करण्यात आला होता. त्याकाळी ब्राहमण सत्यनारायण व तत्सम विधी ब्राहमणेतरांनी करावयाचे नाकारत होते. सीतारामजी गावचे पटवारी होते. १९२९ मध्ये त्यांनी गावानजिकचे त्यांचे शेत शाळेला दान दिले होते. आज त्या जागेवर जि.प. मराठी शाळा आहे. त्यांच्या या सत्यनारायण पुजेचे काम बळीरातवाजी विठोजी जामोदकर, शिवरामजी पाटील जामोदकर, बारीकराव वाठ, नाशिकराव जवंजाळ हे उपस्थित होते. (दीनमित्र १८ जानेवारी १९२२)

उपसंहार: या शिवाय बोपापूर, ब्राहमणवाडा (थडी) पूर्णानगर (थुगाव) अशा गावामध्ये करजगावच्या २०–२५ कि.मी.अंतरावर सत्यशोधक चळवळीची पाळेमुळे रुजलेली होती. म.जोतीराव फुलेंच्या विचारांचा ज्या गावांनी विचार कसा स्वीकारला ती गावे आजही प्रगत दिसतात. समाजाच्या सद्यस्थितीत बदल घडवून आणण्याचे काम सामाजिक चळवळी करतात हे सत्यशोधक चळवळीच्या इतिहासावरुन दिसून येते.

**सतीश जामोदकर, अमरावती**
**मो.९४२३३७४६७८**

# जिल्ह्यातील ४५ आरोग्य संस्थांना कायाकल्प पुरस्कार




**गोंदिया:** आरोग्य संस्थामधील सेवांची गुणवत्ता वाढवण्यासाठी केंद्र शासनाने सुरू केलेल्या कायाकल्प योजनेअंतर्गत जिल्ह्यातील ४५ आरोग्य संस्थांना वर्ष २०२१-२२ वर्षातील कामगिरी केल्याबद्दल ४० लाख रुपयांचे कायाकल्प पुरस्कार जाहीर झाला असल्याचे माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल पाटील यांनी दिली आहे. आझादी का अमृत महोत्सव अंतर्गत आरोग्य संस्थांचा कायापालाट होत असल्याबद्दल आनंद व्यक्त करुन सर्व आरोग्य कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले आहे. इतरही आरोग्य संस्थेने स्पर्धेत उतरुन गुणवत्ता वाढवुन उत्तम आरोग्य सेवा लोकांना देण्याचे आवाहन त्यांनी ह्याप्रसंगी केले.

रुग्णालयातील आरोग्य सेवांचे बळकटीकरण व वैद्यकिय सेवेचा दर्जा वाढवण्यासाठी २०१५ वर्षापासुन कायाकल्प पुरस्कार योजना सुरु केली असून या पुरस्काराकरिता रुग्णालयांची आतील व बाह्य परिसर स्वच्छता, निर्जंतुकीकरण,बेड स्वच्छता,उपलब्ध साधनांचा वापर,योग्य आय.ई.सी लावणे, प्रसूतीगृहाचा वापर व स्वच्छता, प्रयोगशाळा बळकटीकरण व स्वच्छता, अधिकारी व कर्मचाऱ्यांची कार्यक्षमता, रुग्णांना देण्यात येणाऱ्या विविध सेवा,लोकसहभागातुन कार्यक्रम राबविणे,नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर,जैविक घनकचऱ्याचे व्यवस्थापन व त्यांची विल्हेवाट, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, पाणी बचत व सांडपाण्याचा निचरा, कर्मचाऱ्यांचे रुग्णासोबत वर्तणुक, रुग्णांचे मनोगत आदि प्रत्येक बाबीसाठी गुण असून या निकषांवर पुरस्कार जाहिर केले जाते. राज्यस्तरीय पुरस्कारांपैकी नागपूर विभागातून उत्तम दर्जाचा रुग्णसेवेसाठीचा पर्यावरण स्नेही रुग्णालय मानांकन उपजिल्हा रुग्णालय तिरोडाला रु ५ लाखाचा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे.

जिह्यातील उपजिल्हा रुग्णालय, ग्रामीण रुग्णालय, प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्र यांना सुद्धा मानांकन देवुन पुरस्कार देण्यात आला आहे. जिल्ह्यातुन उपजिल्हा रुग्णालय श्रेणीतुन उपजिल्हा रुग्णालय तिरोडाला परत १५ लाख तर प्रोत्साहनपर ग्रामीण रुग्णालय आमगाव, ग्रा.रु.रजेगाव, ग्रा.रु.गोरेगाव, ग्रा.रु. नवेगाव बांध, ग्रा.रु. अर्जुनी मोरगाव यांना प्रत्येकी रु.एक लाख पुरस्कार करिता निवड झाली आहे. प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरासाठीचा प्रथम मानांकन पुरस्कार सडक अर्जूनी तालुक्यातील ड्व्वा प्राथमिक आरोग्य केंद्राला रु दोन लाख तर प्रोत्साहनपर खालील ११ प्राथमिक आरोग्य केंद्र यांना प्रत्येकी रु.५० हजार पुरस्कार करिता निवड झाली आहे. त्यात गोंदिया तालुक्यातील भांनपूर व एकोडी. आमगाव तालुक्यातील ठाणा, गोरेगाव तालुक्यातील सोनी व चोपा, देवरी तालुक्यातील ककोडी, अर्जुनी मोरगाव तालुक्यातील केशोरी व कोरंभीटोला , सडक अर्जुनी तालुक्यातील खोडशिवनी, सालेकसा तालुक्यातील कावराबांध, तिरोडा तालुक्यातील ईदोरा यांचा समावेश आहे.

आरोग्यवर्धिनी उपकेंद्र स्तरासाठी दासगाव प्राथमिक आरोग्य केंद्रातील तेढवा उपकेंद्राला रु. एक लाखासाठीचा प्रथम पुरस्कार तर लहीटोला उपकेंद्राला रु. ५० हजार साठीचा द्वितीय पुरस्कार साठी निवड झाली असुन खालील २४ उपकेंद्राना प्रोत्साहनपर रु.२५ हजार पुरस्कार करिता निवड झाली आहे.पुढिलप्रमाणे तालुकानिहाय उपकेंद्र गोंदिया तालुक्यातील १३ उपकेंद्र त्यात प्राथमिक आरोग्य केंद्र भानपुर अंतर्गत उपकेंद्र कुड्वा,मुंडीपार व ढाकणी, प्राथमिक आरोग्य केंद्र दासगाव अंतर्गत उपकेंद्र पांढराबोडी व डांगोली, प्राथमिक आरोग्य केंद्र मोरवाही अंतर्गत दतोरा व बटाणा, प्राथमिक आरोग्य केंद्र रावणवाडी अंतर्गत उपकेंद्र कंटगीकला व नागरा, प्राथमिक आरोग्य केंद्र खमारी अंतर्गत उपकेंद्र कारंजा, प्राथमिक आरोग्य केंद्र काटी अंतर्गत उपकेंद्र कोरणी , प्राथमिक आरोग्य केंद्र एकोडी अंतर्गत उपकेंद्र गंगाझरी. प्राथमिक आरोग्य केंद्र कामठा अंतर्गत उपकेंद्र छिपीया आमगाव तालुक्यातील ३ उपकेंद्र त्यात प्राथमिक आरोग्य केंद्र कालीमाटी अंतर्गत उपकेंद्र कातुली व गिरोला, प्राथमिक आरोग्य केंद्र बनगाव अंतर्गत उपकेंद्र पदमपुर. सडक अर्जुनी तालुक्यातील २ उपकेंद्र त्यात प्राथमिक आरोग्य केंद्र डव्वा अंतर्गत उपकेंद्र खजरी, प्राथमिक आरोग्य केंद्र खोडशिवनी अंतर्गत उपकेंद्र बोपाबोडी. गोरेगाव तालुक्यातील २ उपकेंद्र त्यात प्राथमिक आरोग्य केंद्र कवलेवाडा अंतर्गत उपकेंद्र कवलेवाडा, प्राथमिक आरोग्य केंद्र कुऱ्हाडी अंतर्गत उपकेंद्र कटंगी. तिरोडा तालुक्यातील २ उपकेंद्र त्यात प्राथमिक आरोग्य केंद्र मुंडीकोटा अंतर्गत उपकेंद्र पांजरा व केसलवाडा. देवरी तालुक्यातील १ उपकेंद्र त्यात प्राथमिक आरोग्य केंद्र मुल्ला अंतर्गत उपकेंद्र पिंडकेपार अर्जुनी मोरगाव तालुक्यातील १ उपकेंद्र त्यात प्राथमिक आरोग्य केंद्र चानाबाकटी अंतर्गत उपकेंद्र निमगाव. पुरस्कार प्राप्त करण्यासाठी सर्व वैद्यकिय अधिकारी , सामुदायिक आरोग्य अधिकारी, आरोग्य सहाय्यक, आरोग्य सहाय्यिका , आरोग्य सेवक, आरोग्य सेविका, आशा सेविका, परिचर, स्वछक यांनी मेहनत घेतली त्यासर्वांचे काम अभिनंदनास पात्र असल्याचे अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. दिनेश सुतार यांनी म्हटले आहे.

# माजी राज्यमंत्र्यानी मुख्यमंत्र्यांपुढे मांडल्या विविध समस्या



**अर्जुनी मोरगाव-** माजी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री तथा गोंदिया जिल्ह्याचे माजी पालकमंत्री इंजि. राजकुमार बडोले यांनी नागपूर हिवाळी अधिवेशनात राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी प्रत्येक भेटून विविध विषयावर चर्चा करून निवेदन दिले. भेटीदरम्यान झालेल्या चर्चेत सर्व विषय मार्गी लावू असे आश्वासन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले. असल्याची माहिती माजी मंत्री राजकुमार बडोले यांनी दिली.

निवेदनानुसार व झालेल्या चर्चेनुसार गोंदिया व गडचिरोली या आदिवासी व नक्षलग्रस्त जिल्हे आहेत. दोन्ही जिल्ह्यातील अनुसूचित जाती प्रवर्गातील मानव विकास निर्देशांक अत्यंत कमी आहे. या जिल्ह्यात मोठया प्रमाणात बेरोजगारी असून, अनुसूचित जातीच्या प्रवर्गातील युवकांसाठी पोलिस व सैनिक भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्र असणे अत्यंत गरजेचे आहे. त्यासाठी विशेष बाब म्हणून प्रस्ताव मंजूर करण्यात यावा. त्याचप्रमाणे सामाजिक न्याय विभागातील सर्व महामंडळाच्या मागील तीन वर्षातील कामाचा आढावा घेऊन बाटी व समता प्रतिष्ठान या संस्थातील सन २०१९-२० ते सन २०२२-२३ या मागील तीन वर्षातील कामांचा आढावा घेण्यासाठी विशेष बैठक लावण्यात यावी.

सामाजिक न्याय विभागाच्या अधिनिष्ठ महात्मा ज्योतिबा फुले आर्थिक विकास महामंडळ, अण्णा भाऊ साठे विकास महामंडळ, संत रविदास चर्मोद्योग विकास महामंडळात वरील तीन वर्षात किती लघु उद्योजकांना वित्तीय पुरवठा करण्यात आला. किती बँकांना प्रस्ताव सादर केले. व बँकांनी अनुसूचित जातीच्या किती उद्योजकांना वित्तीय पुरवठा केला, याबाबत आढावा घेण्यात यावा.

बार्टी या संस्थेचे मागील तीन वर्षात राबविण्यात आलेले उपक्रम व नियोजित उपक्रमाबाबत आढावा घेण्यात यावा. समता प्रतिष्ठान या संस्थेच्या कामकाजाबाबत आढावा घेणे याबाबतची निवेदन माजी मंत्री राजकुमार बडोले यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना दिले. या सर्व मुद्याबाबत सकारात्मक चर्चा करण्यात आली असून सर्व मुद्दे मार्गी लावण्याचे आश्वासन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले असल्याची माहिती माजी मंत्री राजकुमार बडोले यांनी दिली.


## ई निविदा,जाहिर सुचना
## तिसरी वेळ
## जिल्हा परिषद,गोंदिया

गोंदिया जिल्हा परिषद कार्यक्षेत्रात सन २०२२-२३ या वर्षाकरीता विंधण विहिर खोदाई कार्यक्रमासाठी खासगी विंधण यंत्रणामार्फेत विंधण विहरी खोदाई व तदनुषंगीक कामाकरीता दर निश्चिती करुन कंत्राटदार निश्चित करम्यासाठी ई-निविदा कार्यप्रमाणालीव्दारे आँनालईन पध्दतीने या http://mahatenders.gov.in संकेतस्थळावर दिनांक २९/१२/२०२२ रोजी सकाळी ११ वाजेपासून उपलब्ध होऊ शकेल.

| | |
|---|---|
| ऑनलाईन निविदा भरण्याची मुदत | दि.२९/१२/२०२२ रोजी सकाळी ११.०० ते दि.०४/०१/२०२३ रोजी दुपारी ३.०० पर्यंत |
| निविदा पुर्व बैठक | दि.०२/०१/२०२३ रोजी सकाळी ११ ते ४ वा.पर्यंत |
| ऑनलाईन निविदा उघडणे | दि.०५/०१/२०२३ रोजी दुपारी ४.०० वाजता |

ई-निविदा प्रक्रिया संकेतस्थळावर नमुद वेळापत्रकानुसार काटेकोरपणे अमलांत आणली जाईल.प्रस्ताव सादर करण्यासाठी निविदाधारक यांनी केलेल्या आर्थिक खर्चास जबाबदार न राहता कोणताही एक किंवा सर्व प्रस्ताव स्विकारण्याचे किंवा फेटाळण्याचे किंवा प्रस्ताव रद्द करण्याचे अधिकार,मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद गोंदिया यांनी राखून ठेवले आहेत.

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद गोंदिया**


# मद्यधुंद अवस्थेतील शिक्षक निलबिंत

**गोंदिया:-** शिक्षकी पेशाला काळिमा फासणारा प्रकार गोरेगाव तालुक्यातील निंबा येथील शाळेत गुरुवारी उघडकीस आला होता. यानंतर शिक्षण प्रशासन खळबडून जागे झाले. मद्यधुंद शिक्षकाला निलबिंत करण्यात आले आहे. गोरेगाव पंचायत समितीचे प्रभारी गटशिक्षणाधिकारी निलकंठ शिरसाटे यांनी मद्यधुंद शिक्षक घनशाम मरसकोल्हेची चौकशी करून यासंबंधीचा अहवाल जिल्हा परिषदेतील शिक्षणाधिकारी कार्यालयात सादर केला होता.त्या अहवालावर कारवाई करीत शिक्षणाधिकारी महेंद्र गजभिये यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल पाटील यांच्या आदेशाने सदर शिक्षकाला निलबिंत केले आहे.

**तीन वर्षांपूर्वीही निलंबित**

शिक्षक मरसकोल्हे यांना दारुचे व्यसन आहे. देवरी पंचायत समितीमध्ये कार्यरत असताना ऑगस्ट २०१९ मध्ये त्यांना निलंबित करण्यात आले होते. शिक्षण आयुक्तांकडे कारवाई संदर्भातील प्रकरण प्रलंबित आहे.

# मॉडेल कॉन्व्हेंट व कनिष्ठ महाविद्यालयाचे गोरेगांव वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात




**गोरेगांव :-** स्थानीय मॉडेल कॉन्व्हेंट एण्ड सायन्स कनिष्ठ महाविद्यालय गोरेगांव मध्ये दोन दिवसीय स्पोर्ट्स डे व वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले. या दोन दिवसीय स्पोर्ट्स डे व वार्षिक स्नेहसंमेलनाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे संस्थापक तसेच आरटीई फाउंडेशन गोंदियाचे जिल्हा अध्यक्ष प्रा.आर. डी. कटरे हे होते. उद्घाटक म्हणुन सामाजिक कार्यकर्ता राहुल कटर उपस्थित होते.प्रमुख अतिथी म्हणुन पालक शिक्षक संघाचे उपाध्यक्ष लोकेश कटरे, शाळेचे प्रशासकीय अधिकारी सी. बी. पटले, प्राचार्य सौ. सी. पी. मेश्राम हे प्रामुख्याने उपस्थित होते.

कार्यक्रमाला उपस्थित शाळेच्या प्राचार्य सौ. सी. पी. मेश्राम यांनी शाळेच्या प्रास्ताविक सादर करतांना शाळेच्या प्रारंभ काळापासून ते आज पर्यंत असलेल्या सर्व सोईसुविधांची माहिती कार्यक्रमाच्या माध्यामातून पालकांना दिली. तसेच उदघाटक राहुल कटरे, प्रमुख अतिथी लोकेश कटरे, प्रशासकीय अधिकारी सी. बी. पटले यांनी स्नेहसंमेलनाच्या माध्यामातून विद्यार्थ्याच्या सुप्त गुणांना चालना मिळत असल्याबद्दलचे मार्गदर्शन केले. स्नेहसंमेलन हे फक्त विद्यार्थ्यांना मनोरंजन नसून त्यांच्यात असलेल्या सुप्त गुणांना सर्व समोर प्रदर्शित करण्याचे त्याचबरोबर विद्यार्थ्यांमधे असलेल्या उणीवा दूर करण्याचे एक माध्यम असते असे आपल्या मार्गदर्शन भाषणातून सांगितले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा.आर डी. कटरे यांनी आपल्या मार्गदर्शनातून येत्या नवीन वर्षाच्या शुभेच्छा देत विद्यार्थ्यांना देत शाळेचे नाव मॉडेल ठेवण्याचे उद्देश सर्वांसमोर मांडले. ते आज सर्वांसमोर एक मॉडेल तयार होऊन डौलाने उभी आहे यांबद्दल संपूर्ण माहिती पालकांना दिली. स्पोर्ट्स डे निमित्त विद्यार्थ्यांसाठी विविध प्रकारच्या खेळाचे आयोजन करण्यात आले. त्यामधे विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहात व आनंदाने स्पर्धा मध्ये भाग घेतले. त्याचबरोबर पालकांकरिता खेळाचे आयोजन शाळेमार्फत करण्यात आले त्यामधे पालकांनी सुद्धा आनंदात खेळांमधे भाग घेत सहकार्य केले. विजयी झालेल्या सर्व स्पर्धकांना बक्षीस देऊन त्यांचे अभिनंदन करण्यात आले. स्नेहसंमेलनच्या माध्यामातून विद्यार्थ्यांनी विविध रंगारंग कार्यक्रमाची प्रस्तुति सादर केली त्यामध्ये एकांकिका, कोळीगीत, समूहगीत अशाप्रकारचे कार्यक्रम सादर केले.

कार्यक्रमाला यशस्वी रित्या संपन्न करण्याकरिता शाळेतील प्रशासकीय अधिकारी, प्राचार्य, पर्यवेक्षक तसेच सर्व शिक्षक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी व शाळेतील सर्व विद्यार्थी यांनी सहकार्य केले. कार्यक्रमाचे संचालन वर्ग १० वी चे विद्यार्थी समीर रहांगडाले, प्रेरणा रहांगडाले यांनी केले तसेच आभार स. शी. आशा बोपचे यांनी मानले.


## उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवन्नोत्ती अभियान अंतर्गत समता समूह मु.सावरटोला, पो-चान्ना/कोडका पंचायत समिती अर्जुनी मोरगाव,जिल्हा गोंदिया
## जाहिर निविदा

जा.क्र.स.स.सावरटोला-०३/२०२२

समता समूह सावरटोला अंतर्गत तालुका अर्जुनी मोरगाव, जि.गोंदिया येथे स्वयं सहायता समूह स्तरावर मानव विकास मिशन निधी अंतर्गत फिरते मत्स्य विक्री केंद्राकरिता नोंदणीकृत कंपनीकडून टेंडर/पुरवठादार/डिलरकडून चार चाकी वाहनाची बंद लिफापा पध्दतीने निविदा मागविण्यात येत आहे.

**निविदा पध्दतीचा तपशील**

| अ.क्र. | गाडीचे नाव | अंदाजे खर्च |
|---|---|---|
| १ | चार चाकी वाहन On Road (इंश्यूरंस पासींग व इतर) | १० लाख रूपये |
| २ | गाडीची Indore design | ४ लाख रूपये |
| | एकुण रुपये | १४ लाख रुपये |

बंद निविदा दिनांक २४/१२/२०२२ च्या सकाळी १०.०० वाजेपासून ते दिनांक २८/१२/२०२२ च्या सायकांळ ५ वाजेपर्यंत. समता समूह मु.सावरटोला पो.चान्ना/कोडका ता.अर्जुनी मोर जि.गोंदिया यांच्याकडे सादर करावे. सदर निविदा बंद लिफाफा दि.३०/१२/२०२२ दुपारी १२ वाजता उघडण्यात येईल. सदर गाडीची खरेदी करण्याचे पूर्ण अधिकार समता समूह सावरटोला यांच्याकडे राखून ठेवण्यात आलेले आहे.

**अध्यक्ष/सचिव**
समता समूह मु.सावरटोला पो.चान्ना/कोडका
ता.अर्जुनी मोरगाव जि.गोंदिया पिन.४४१७०२


# वैद्यकीय अधिक्षकांच्या गैरवर्तणुकीमुळे कर्मचाऱ्यांमधे संताप



**कर्मचाऱ्यांनी केलेले आरोप निरर्थक-डॉ. गजभिये**
आपण कुणाशिही असभ्यतेने वागलो नाही. कामाकडे दुर्लक्ष करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी रागावणे सहज बाब आहे. रितसर कामाविषयी बोलतो, कर्मचाऱ्यांनी केलेले आरोप निरर्थक आहेत.

**देवरीः** लोकसेवकाने नागरिक तथा कार्यालयील सेवकांना सौजन्यपुर्वक वागणुक देणे अपेक्षित आहे. मात्र येथील ग्रामीण रुग्णालयात कार्यरत वैद्यकीय अधिक्षक (Medical Superintendent) हे त्यांच्या कर्मचाऱ्यांशी गैरवर्तणुक करीत असल्यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये त्यांच्याप्रति तिव्र संताप व्यक्त होत असून त्यांनी आपल्या वागणुकीत सुधारणा न केल्यास कर्मचाऱ्यांनी आंदोलनाचा इशारा दिला आहे. देवरी ग्रामीण रुग्णालयात कार्यरत वैद्यकीय अधीक्षक (Medical Superintendent) आणि कर्मचाऱ्यांमधे वाद वाढत चालला आहे. आरोग्य कर्मचारी, परिचारिकांशी वैद्यकीय अधिक्षक सभ्यतेने वागत नाही, शिविगाळ करतात. कर्तव्र्य व अधिकाराचा गैरवापर करून रुग्णालयात नियमित कर्मचारी असून ही त्यांना शल्यचिकित्सा कक्षात प्रवेश न देता बाहेरिल अप्रशिक्षित व्यक्तींना रोजंदारीवर घेऊन त्यांच्याकडून काम करित असल्याचा आरोपही कर्मचाऱ्यांनी केला आहे.

वैद्यकीय अधिक्षक परिसेविका, परिचारिका व इतर कर्मचाऱ्यांचे वेतन विणाकारण कपात करित असल्याचेही कमचाऱ्यांचे म्हणने आहे. कर्मचारी, परिसेविका व परिचारिका यांनी जिल्हा शल्य चिकित्सक यांना तक्रार करुन ही कारवाई करण्यात आली नाही. २५ डिसेंबर पर्यत वैद्यकीय अधिक्षक डॉ. आनंद गजभिये यांच्यावर कारवाई न झाल्यास उपोषण करण्याचा ईशारा इशारा कर्मचाऱ्यांनी निवेदनातुन दिला आहे. निवेदनाच्या प्रति आमदार सहेषराम कोरोटे, जिल्हा शल्य चिकित्सक यांना पाठविल्या आहेत.

## कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजनेंतर्गत शेतजमीन मिळविण्यासाठी अर्ज आमंत्रित

**गोंदिया :** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजनेअंतर्गत अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या दारिद्रेरेषेखालील व भूमिहीन कुटूंबाला ४ एकर जिरायती (कोरडवाहू) व २ एकर बागायती (ओलिताखाली) जमीन लाभार्थ्यांना वितरीत करण्याकरीता दारिद्ररेषेखालील व भूमिहीन लाभार्थ्यांना १०० टक्के अनुदानावर शेतजमीन वाटप करण्यात येते. त्या अनुषंगाने मौजा किन्ही व मौजा डांगोली ता.गोंदिया येथील रहिवासी असलेले किंवा लगतच्या गावातील अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या दारिद्रेरेषेखालील व भूमिहीन कुटूंबातील लाभार्थ्यांकडून शेतजमीन मिळण्याकरीता अर्ज मागविण्यात येत आहे.


## कार्यालय ग्राम पंचायत बाराभाटी
पंचायत समिती अर्जुनी/मोर,जिल्हा परिषद गोंदिया

## निविदा सुचना
**(पहिली वेळ)**

सर्व इच्छुक साहित्य पुरवठा धारकास सुचित करण्यात येत आहे की, ग्राम पंचायत बाराभाटी ला खालील विवरण पत्राप्रमाणे साहित्याची आवश्यकता असल्याने ईच्छुक पुरवठा धारकाकडून दिनांक **०५/०१/२०२३** ला **दुपारी ३.०० वाजे पर्यंत** लिफाफा पद्धतीने निविदा दरपत्रक मागविण्यात येत आहे. निविदा फार्म प्रक्रिया **दिनांक २८/१२/२०२२ ते ०५/०१/२०२३** पर्यंत कार्यालयीन वेळेत राहील.निविदा बाबतचे अटी व शर्ती संबंधित ग्राम पंचायत कार्यालयात कार्यालयीन दिवशी व वेळेत पहावयास मिळेल. सदर निविदा **दिनांक २८/१२/२०२२ ते ०५/०१/२०२३ दुपारी ३.०० वाजे पर्यंतचे** कालावधीत कार्यालयीन वेळेत स्विकारण्यात येतील.

| अनु.क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजपत्रकीय रक्कम | निविदा फार्म ची किंमत | अनामत रक्कम (१%) | काम पूर्ण करण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | जिल्हा परिषद शाळा ब्राम्हणटोला दुरुस्ती करणे | २०००००/- | ५००/- | २०००/- | ३ महिने |
| २ | अंगणवाडी करीता शौचालय बांधकाम करणे | ८००००/- | ५००/- | ८००/- | ३ महिने |
| ३ | ग्राम पंचायत इमारत दुरुस्ती करणे | २०००००/- | ५००/- | २०००/- | ३ महिने |
| ४ | अंगणवाडी दुरुस्ती व रंगरंगोटी करणे | ६००००/- | ५००/- | ६००/- | ३ महिने |
| ५ | सार्वजनिक दिवाबत्ती करीता एल ई डी बल्ब खरेदी करणे | ४००००/- | | | १ महिने |

१) वरील कामाचे निविदाा फॉर्म दिनांक २८/१२/२०२२ ला सकाळी ११.०० वाजे पासून ते दि. ०५/०१/२०२३ ला दुपारी ३.०० वाजेपर्यंत (सुट्टीचे दिवस वगळून) या कालावधीत ग्राम पंचायत कार्यालय बाराभाटी येथे कार्यालयीन वेळेत निविदा फॉर्म विक्री करण्यात येईल व निविदा फॉर्म विक्री केल्यानंतर पावती मिळेल. २) सदर निविदा मोहरबंद लिफाफ्यात आवश्यक त्या कागदपत्रासह दिनांक २८/१२/२०२२ ला सकाळी ११.०० वाजे पासून ते दि.०५/०१/२०२३ ला दुपारी ३.०० वाजेपर्यंत (सुट्टीचे दिवस वगळून) या कालावधीत ग्राम पंचायत कार्यालयात स्विकारण्यात येईल. तसेच अनामत रक्कम भरल्याची पावती मिळेल. ३) मोहरबंद निविदा लगतच्या मासिक सभेत ग्राम पंचायत बाराभाटी येथे उघडण्यात येईल. ४) सदर कामाचा तपशीलवार संपूर्ण माहिती अटीशर्तीसह ग्राम पंचायतच्या नोटीस बोर्डावर प्रसिद्ध केले आहे.

**सरपंच**
**ग्राम पंचायत बाराभाटी**

**ग्रामसेवक**
**ग्राम पंचायत बाराभाटी**



## कार्यालय ग्राम पंचायत येरंडी/देवल
पंचायत समिती अर्जुनी/मोर,जिल्हा परिषद गोंदिया

## निविदा सुचना
**(पहिली वेळ)**

सर्व इच्छुक साहित्य पुरवठा धारकास सुचित करण्यात येत आहे की, ग्राम पंचायत येरंडी/देवल ला खालील विवरण पत्राप्रमाणे साहित्याची आवश्यकता असल्याने इच्छुक पुरवठा धारकाकडून दिनांक ०५/०१/२०२३ ला **दुपारी ३.०० वाजे पर्यंत** लिफाफा पद्धतीने निविदा दरपत्रक मागविण्यात येत आहे. निविदा फार्म प्रक्रिया **दिनांक २८/१२/२०२२ ते ०५/०१/२०२३** पर्यंत कार्यालयीन वेळेत राहील.निविदा बाबतचे अटी व शर्ती संबंधित ग्राम पंचायत कार्यालयात कार्यालयीन दिवशी व वेळेत पहावयास मिळेल. सदर निविदा **दिनांक २८/१२/२०२२ ते ०५/०१/२०२३ दुपारी ३.०० वाजे पर्यंतचे** कालावधीत कार्यालयीन वेळेत स्विकारण्यात येतील.

| अनु.क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजपत्रकीय रक्कम | निविदा फार्म ची किंमत | अनामत रक्कम (१%) | काम पूर्ण करण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | जिल्हा परिषद शाळा व विहिरी जवळील परिसर मध्ये पेव्हर ब्लॉक लावणे | २०००००/- | ५००/- | २०००/- | ३ महिने |
| २ | अंगणवाडी करीता शौचालय बांधकाम करणे | १०००००/- | ५००/- | १०००/- | ३ महिने |
| ३ | नाली दुरुस्ती बांधकाम करणे | २०००००/- | ५००/- | २०००/- | ३ महिने |
| ४ | सिमेंट नाली बांधकाम १५ वा वित्त पंचायत समिती स्तर | ३०००००/- | ५००/- | ३०००/- | ३ महिने |
| ५ | सौर उर्जेवर आधारित दिवाबत्ती सोय करण्याकरिता साहित्य खरेदी करणे व बसविणे (२ नग) | ६००००/- | ५००/- | ६००/- | १ महिने |
| ६ | सार्वजनिक दिवाबत्ती करीता एल ई डी बल्ब खरेदी करणे | ४००००/- | | | १ महिने |

१) वरील कामाचे निविदाा फॉर्म दिनांक २८/१२/२०२२ ला सकाळी ११.०० वाजे पासून ते दि. ०५/०१/२०२३ ला दुपारी ३.०० वाजेपर्यंत (सुट्टीचे दिवस वगळून) या कालावधीत ग्राम पंचायत कार्यालय येरंडी/देवल येथे कार्यालयीन वेळेत निविदा फॉर्म विक्री करण्यात येईल व निविदा फॉर्म विक्री केल्यानंतर पावती मिळेल. २) सदर निविदा मोहरबंद लिफाफ्यात आवश्यक त्या कागदपत्रासह दिनांक २८/१२/२०२२ ला सकाळी ११.०० वाजे पासून ते दि.०५/०१/२०२३ ला दुपारी ३.०० वाजेपर्यंत (सुट्टीचे दिवस वगळून) या कालावधीत ग्राम पंचायत कार्यालयात स्विकारण्यात येईल. तसेच अनामत रक्कम भरल्याची पावती मिळेल. ३) मोहरबंद निविदा लगतच्या मासिक सभेत ग्राम पंचायत येरंडी/देवल येथे उघडण्यात येईल. ४) सदर कामाचा तपशीलवार संपूर्ण माहिती अटीशर्तीसह ग्राम पंचायतच्या नोटीस बोर्डावर प्रसिद्ध केले आहे.

**सरपंच**
**ग्राम पंचायत येरंडी/देवल**

**ग्रामसेवक**
**ग्राम पंचायत येरंडी/देवल**

# जुन्या पेंशनकरीता शासकीय कर्मचाऱ्यांकडुन एक दिवसाची भारत बंदची हाक!

**गोंदिया:**– राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सहकारी कर्मचाऱ्यांना जुनी पेंशन दिल्यास तिजीरोवर एक लाख कोटींचा बोजा पडेल, राज्य दिवाळखोरीत निघेल. त्यामुळे जुनी पेंशन देणार नसल्याचे स्पष्ट केले. यामुळे या प्रश्नासाठी गेल्या वर्षभरापासून लढा उभारणारी महाराष्ट्र राज्य कर्मचारी सहकारी कर्मचारी संघटना आक्रामक झाली आहे. जुनी पेंशन देणे राज्य सरकारचे कर्तव्य नाही का, असा सवाल राज्य सरकारी कर्मचारी संघाचे देविदास जरारे यांनी केला आहे. सरकारी कर्मचाऱ्यांच्या १८ लाखांपैकी ४ लाख ६९ हजार जागा रिकाम्या आहेत. तरीही जुन्या पेन्शनने एक लाख कोटींचा बोजा कसा, असाही प्रश्न कर्मचारी विचारत आहेत.

कर्मचारी संघटनेच्या मते हा खर्च राज्याच्या लोककल्याणासाठी हिताताच आहे. सरकारी कर्मचाऱ्यांच्या माध्यमातूनच योजना राबवण्याचे काम केले जाते. प्रशासन जितक्या जास्त प्रमाणात सक्षम असेल तितके सरकारदेखील गतीने चालते. त्यामुळे कर्मचाऱ्यांच्या पेन्शनवर होणारा खर्च हा दिसत असला तरी तो राज्य सरकारच्या कर्तव्याचा भागच आहे. त्यामुळे खर्च सांगून यामधून सरकारचे पळ काढू नये, अशी भूमिका कर्मचारी मध्यवर्ती संघटनेच्यावतीने मांडण्यात आली आहे.

महाराष्ट्र शासनाने १ नोव्हेंबर २००५ नंतर नियुक्त कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना बंद करून ,नवीन पेन्शन योजना सुरू केलेली आहे. सोबतच १नोव्हेंबर २००५ पूर्वी नियुक्त पण नंतर शंभर टक्के अनुदान प्राप्त शाळातील कर्मचाऱ्यांना त्यांच्या हक्काची जुनी पेन्शन योजना डावलून त्यांना सुद्धा नवीन पेन्शन योजनेत सहभागी करण्याचं षडयंत्र महाराष्ट्र शासनाने आखलं आहे. या अन्यायाविरुद्ध व सर्वांना जुनी पेन्शन योजना मिळावी यासाठी आता आंदोलनात्मक प्रवित्रा घेण्याची वेळ आल्याचे माजी जिल्हाध्यक्ष महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन हक्क संघटना व गोंदिया जिल्हा महसूल कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष आशिष रामटेके यांनी म्हटले आहे.

सरकारने शासकीय कमचाऱ्यांना १९८२–८४ ची जुनी पेन्शन योजना रद्द करुन नविन पेंशन योजना लागु केलेली आहे , परंतु या नविन पेन्शन योजनेंमध्ये सेवानिवृत्तीनंतर उदरनिर्वाह चालत नाही . यामुळे जुनी पेन्शन योजना पुन्हा सुरु करण्याकरीता कर्मचाऱ्यांकडुन आपल्या न्याय, अधिकारांसाठी एक दिवसीय भारत बंदची हाक दिली आहे. जुनी पेन्शन या प्रमुख मागणीकरीता देशाभरातील सुमारे ३६ लाख शासकीय कर्मचारी एकत्रित येणार आहेत .नॅशनल रेल्वे मजदूर यूनियनच्या वार्षिक अधिवेशन नागपुर येथे होणार आहे , यावेळी ऑल इंडिया रेल्वे मेन्स फेडरेशनचे सरचिटणीस शिवगोपाल मिश्रा यावेळी बोलताना सांगत होते कि, ५० हजार रुपये वेतन असणाऱ्या कर्मचाऱ्याला साधारण अडीच हजार रुपये पेंन्शन मिळते .तर जुनी पेन्शन प्रमाणे निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांस २५,०००/– रुपये निवृत्तीवेतन मिळायचे.



सध्या देशभरांमध्ये जुनी पेन्शनसाठी कर्मचाऱ्यांकडुन आंदोलने करण्यात येत आहेत . काही राज्यांनी कर्मचाऱ्यांचे हित लक्ष्यात घेवून जूनी पेन्शन योजना लागु केली आहे. महाराष्ट्र राज्य सरकारने जुनी पेन्शन योजना लागु केल्यास राज्य सरकार दिवाळखोरीत जाईल असे भाष्य अधिवेशनांमध्ये केल्याने , राज्य कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागु होण्याची अशा मावळताना दिसत आहेत .

परंतु विविध संघटनांकडुन देशपातळीवर जुनी पेन्शनच्या मागणीकरीता विविध अधिवेशन घेवून, सरकारला कोंडीत काढण्यात येणार आहेत. जर सरकार याबाबत सकारात्मक भुमिका घेत नसल्यास, सरकारकडुन लवकरच भारत बंदची हाक देण्यात येणार आहे .

एकीकडे पाच वर्षासाठी निवडलेल्या आमदार खासदारांवर पेंशनपोटी कोट्यवधी रुपये खर्च केले जातात, तर रात्रदिवस ६० वर्षापर्यंत शासकीय सेवा करणाऱ्याला पेंशन नाकारणे म्हणजे लोकप्रतिनिधी व सरकारची कर्मचारी वर्गाप्रती असलेली भूमिका संशयास्पद व अयोग्य आहे. १ नोव्हेंबर २००५ पूर्वी नियुक्त सर्वच विभागातील कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू आहे. पण फक्त शिक्षक शिक्षक्केतर कर्मचारी यांना मात्र त्यांची हक्काची जुनी पेन्शन योजना नाकारलेली आहे. हा अन्याय कदापी सहन केला जाणार नाही. सर्वच कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन मिळावीया साठी आपण फार मोठे आंदोलन केले जाणार आहे. महाराष्ट्र शासनाने अन्यायकारक नवीन पेन्शन योजना चालू केली, व हा कर्मचाऱ्यांवर झालेला अन्याय आहे. समान न्यायाच्या तत्त्वावर सर्वांना जुनी पेन्शन योजना मिळावी, हा त्यांचा हक्क आहे. तो हिरावला जाऊ नये, यासाठी हिवाळी अधिवेशनात राज्यातील सर्व कर्मचारी संघटनानी एकत्र येत कामबंद आंदोलन पुकारुन नागपूरचे हिवाळी अधिवेशन गाजवण्याची वेळ असल्याचेही रामटेके यांनी म्हटले आहे.

सध्या काही राज्यांनी नवीन पेन्शन योजना बरखास्त करून आपल्या कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागु केलेली आहे. त्यात झारखंड, राजस्थान, छत्तीसगड नंतर पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान यांनी जुन्या पेन्शन योजनेला मंजुरी दिली आहे.

जुन्या पेन्शनसाठी लढणाऱ्या सर्व संघटना आणि कार्यकर्ते यांना आणखी एक राज्य जिंकण्यात यश मिळाले आहे. गुजरातमध्ये सत्तेवर आल्यानंतर जुनी पेन्शन योजना सुरू करू असे आश्वासन काँग्रेसच्या जाहिरनाम्यात देण्यात आले होते. पुढील काळात प्रत्येक राजकीय पक्षांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याचा निर्णय जाहीर करण्याशिवाय पर्याय उपलब्ध राहणार नाही एवढा दबाव आंदोलनातून वाढवला पाहिजे, असेही ते म्हणाले. आपली लढाई अंतिम टप्प्यात आली आहे. आत्ता गप्प बसून चालणार नाही. प्रत्येकाला बेमूदत संपाच्या लढाईत उतरवण्यासाठी जोर लावावा लागेलच. अभी नहीं तो कभी नहीं! असे आशिष रामटेके यांनी म्हटले आहे. राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना आणि अखिल भारतीय राज्य सरकारी कर्मचारी महासंघ यांच्या आदेशानुसार सरकारी निमसरकारी कर्मचारी आणि शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी संघटना समन्वय समितीने जुनी पेन्शन योजना लागू करा, या मागणीसाठी आंदोलन करण्याचा निर्णय घेतला आहे.

राज्य सरकारी निमसरकारी कर्मचारी व शिक्षक शिक्षकेतर कमचारी संघटना समन्वय समितीसह राज्यातील शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना बेमुदत संपात सहभागी होण्याबाबत जागरूकता निर्माण करणे आणि जुन्या पेन्शनची मागणी पूर्ण होईपर्यंत संप मागे न घेण्याची भूमिका सर्व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सांगण्यासाठी आपण सर्वांनी जनजागृती करणे आवश्यक आहे.जुन्या पेन्शनसाठी पुकारण्यात येणाऱ्या बेमुदत संपात मंत्रालयीन कर्मचारी, जिल्हा परिषद कर्मचारी, राज्य शासनाच्या विविध विभागातील सर्व कर्मचारी सहभागी व्हावे,असे आवाहन करण्यात आले आहे.

# राज्यात १८ लाखांपैकी ४ लाख ६९ हजार जागा रिकाम्या, तरीही एक लाख कोटींचा बोजा कसा?

## यशवंतराव चव्हाणांच्या वक्तव्याची आठवण ठेवा

**जरारे म्हणाले की ६ नोव्हेंबर १९६२ रोजी तत्कालीन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी मध्यवर्ती संघटनेच्या अधिवेशनात सांगितले होते की, राज्य प्रशासकीय यंत्रणा सक्षम ठेवण्यासाठी सरकारी कर्मचारी व अधिकारी यांना सोयी–सवलती दिल्या पाहिजेत. सरकारी कर्मचारी कल्याणकारी राज्याचे प्रमुख घटक आहेत. त्यांच्याकडून योग्य प्रकारे काम करुण घेणे सरकारची जवाबदारी आहे.**

## ६० टक्क्यांना तर जुनी योजना लागूच होत नाही

**राज्यात १८ लाख ४ हजार ४७४ पैकी ४ लाख ६९ हजार २२४ जागा रिकाम्या आहेत. १३ लाख ३५ हजार ७८१ पैकी ६० टक्क्यांना जुनी पेन्शन योजना लागू होत नाही तरीही उपमुख्यमंत्री एक लाख कोटींचा बोजा कसा सांगत आहेत. त्यांच्या आकडेमोडीत तफावत कशी काय पडली? असा सूर कर्मचाऱ्यांमधून लावला जात आहे.**

शासनाचा हा निर्णय दु:खद आहे. आमदारांवर वारेमाप खर्च करणाऱ्या सरकारची ४० वर्षे सेवा देणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या पेन्शनबद्दल दृटप्पी भूमिका आहे. मुंबईत संघटनांची बैठक होत आहे. त्यामध्ये पुढील आंदोलनाची दिशा ठरविण्यात येईल. **नरेंद्र जगताप, सरचिटणीस राज्य महसूल कर्मचारी मध्यवर्ती संघटना**

गुजरात,हिमाचल,छत्तीसगड व अन्य कमी प्रगतशील राज्यांनी जुनी पेंशन लागू केली असताना देशातील प्रगतशील महाराष्ट्रात ती लागू केली जात नाही. यापेक्षा दुदैव काय असेल. निवृत्तीनंतर दोन ते अडीच हजार रुपये पेंशन कर्मचाऱ्यांच्या हाती पडेल. या रुपयांमध्ये कुटुंब देखील सांभाळू शकणार नाही. त्यामुळे आंदोलनाशिवाय पर्याय नाही.सर्वांनी एकत्र येणे गरजेचे आहे.
**दिनेश वाघ, जिल्हाध्यक्ष मध्यवर्ती कर्मचारी संघटना**

शासन आमदारांवर कोट्यावधींचा खर्च करते. आमदारांना जन्मभर पेंशन लागू होते. पण आयुष्याची ३५ वर्षे सेवा करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या पेंशनसाठी शासनाकडे पैसे नाही. जुन्या पेंशन योजनेसाठी कर्मचाऱ्यांनी विविध मार्गाने आंदोलन करुनही ती लागू होत नसल्यास आंदोलनाशिवाय पर्याय राहिलेला नाही.२००५ पासून राज्यात नोकरभरती सुध्दा बंद आहे.कोरोनाकाळात जीव धोक्यात घालून पेंशन नसलेल्या कर्मचारी वर्गाने काम केले आहे,तरीही शासन अडेलतट्टू भूमिका घेत असल्याने विचार करण्याची वेळ आली आहे. **कमलेश बिसेन, जिल्हा अध्यक्ष ग्रामसेवक संघटना,गोंदिया**

जुनी पेंशन लागू झालीच पाहिजे. त्यासाठी प्रसंगी आंदोलन करु तथा बेमुदत संपही पुकारावा लागणार आहे. शासनाच्या आमच्या वरिष्ठ कर्मचारी संघटनांची बैठक मुंबईत आयोजित करण्यात आली आहे. त्यातील निर्णयानुसार पुढील दिशा ठरवली जाईल. **अरुण तांबे, सरचिटणीस चतुर्थ श्रेणी महसूल कर्मचारी संघटना, नाशिक**

जुनी पेंशन लागू केली तर राज्यावर एक लाख १० हजर कोटींचा बोजा पडून राज्य दिवाळखोरीत निघेल, असे जाहीर करताना उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी हे सुद्धा स्पष्ट करायला हवे होते की आमदार, खासदारांना वाढीव वेतन, पेंशन आणि महागाई भत्ता दिल्याने राज्यावर किती बोला पडला? हे ते कधीच सांगणार नाहीत. कारण याचा लाभ त्यांच्याही पदरात पडत आहे. **पी.जी.शहारे, राज्य उपाध्यक्ष,म.रा.जि.प.कर्मचारी महासंघ**

जुन्या पेंशनसंदर्भात सरकारे विधानसभेत दिलेले आकडे हे फुगवलेले आहेत. जुन्या पेंशनचा खर्च एनपीएसपेक्षा कमी आहे. तसे नसते तर जुनी पेंशन लागू ठेवणारे प.बंगाल व करणारे छत्तीसगड,राजस्थान,हिमाचल हे आज दिवाळखोरीत असते. जुनी पेंशन योजना लागू केल्यास महाराष्ट्र दिवाळखोरीकडे जाईल असे सांगणे म्हणजे जनतेला मूर्ख बनवण्याचा प्रकार आहे.
**वितेश खांडेकर, राज्य अध्यक्ष,महाराष्ट्र राज्य जुनी पेंशन संघटना**

## २९ डिसेंबरला जिल्हास्तरीय युवा महोत्सव

**गोंदिया:** क्रीडा व युवक सेवा संचालनालय पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व जिल्हा क्रीडा परिषद गोंदिया यांचे संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय युवा महोत्सवाचे आयोजन २९ डिसेंबर २०२२ रोजी गोंदिया येथे करण्यात येणार आहे.

महोत्सवाअंतर्गत लोकगीत, लोकनृत्य या कलाबाबींचा समावेश राहणार असून लोकगीतासाठी साथसंगत देणाऱ्यासह जास्तीत जास्त १० स्पर्धक व लोकनृत्यासाठी २० स्पर्धक सहभागी होऊ शकतात. लोकगीत लोकनृत्य या स्पर्धेत सहभागी होणाऱ्या स्पर्धक व साथसंगत देणाऱ्याचे वय १५ ते २९ या वयोगटाचे असावे, त्याबाबतचा जन्म तारखेचा दाखला अर्जासोबत जोडावा. पार्श्वगायन सादर करणाऱ्या संस्थांना यामध्ये प्रवेश नोंदविता येईल. लोकनृत्य सादर करणारे संघाने पुर्वध्वनीमुद्रीत, टेप अथवा कॅसेटला परवानगी दिली जाणार नाही. तसेच लोकगीत सादर करणाऱ्या संघाचे गीत व लोकनृत्य चित्रपटबाह्य असावे.

तरी जिल्हास्तरीय युवा महोत्सवात जास्तीत जास्त शाळा, महाविद्यालय व सांस्कृतिक मंडळ तसेच गोंदिया जिल्ह्यातील १५ ते २९ वर्ष वयोगटातील कलावंतांनी आपले अर्ज दिनांक २८ डिसेंबर २०२२ पर्यत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाच्या या संकेतस्थळावर सादर करावे किंवा कार्यालयात प्रत्यक्ष येऊन प्रवेश निश्चित करावा. स्पर्धेच्या अधिक माहितीकरीता जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे जिल्हा क्रीडा अधिकारी घनश्याम राठोड यांनी कळविले आहे.

# हवामान बदलासाठी जिल्हा अनुकूल

**गोंदिया:** जागतिक वातावरण बदलामुळे राज्याचे सरासरी तापमान वाढणार असून त्याचा प्रथम फटका बसण्याची शक्यता असलेल्या राज्यातील दहा जिल्हे अतिसंवेदनशील घोषित करण्यात आले आहेत. त्या जिल्ह्यांमध्ये बदलासाठी अनुकूल ठरणाऱ्या उपाययोजना राबविण्याची जवाबदारी जिल्हाधिकाऱ्याकडे आहे. मात्र सर्वच पातळीवर सामसून असल्याचे चित्र सध्यातरी आहे. अतिसंवेदनशील घोषित करण्यात आलेल्या दहा जिल्ह्यांमध्ये गोंदिया जिल्ह्याचा देखील समावेश आहे.



वातावरणातील बदलांमुये मुख्यत: अनियमित पाऊस, तीव्र दुष्काळ, मोठे पूर, जमिनीतील पोषक द्रव्यांचा असमतोल, वॉटर लॉगिंग, अन्न सुरक्षा, रोगराईत होणारी वाढ, जंगल व पाण्याची उपलब्धता यावर मोठे परिणाम होणार आहेत. आकस्मिक अतिवृष्टीने महापूर येणे किंवा काही ठिकाणी दुष्काळ पडणे या घटनांमध्ये वाढ होत आहे. अतिसंवेदनशील जिल्ह्यात प्रथम क्रमांक राज्यातील नंदूरबारचा आहे. त्यापाठोपाठ धुज़े, बुलढाणा, जळगाव, हिंगोली, नाशिक, जालना, गोंदिया, वाशिम आणि गडचिरोली जिल्ह्यांचा समावेश आहे.

संभाव्य परिणामांना सामोरे जाण्यासाठी केंद्र शासनाने २००८ मध्येच राष्ट्रीय वातावरणीय बदल कृती आराखडा राज्यांना दिला. त्या आराखड्यानुसार उपाययोजना राबविण्याचे निर्देश ऑक्टोबर २०१७ मध्ये राज्याच्या पर्यावरण विभागाने दिले. आराखड्यामध्ये वातावरणात होणाऱ्या बदलांचा फटका बसणाऱ्या जिल्ह्यांचा क्रमही ठरविण्यात आला. राज्यातील जिल्ह्यांचा संवेदनशील निर्देशांक ठरला आहे. भौगोलिक परिस्थितीनुसार नियोजन करुन जिल्हास्तरीय अनुकूल आराखडे तयार करणे, त्याची अंमलबजावणी करण्यासाठी निधी प्राप्त करुण घेणे, प्रकल्पांची अंमलबजावणी करणे, त्यासाठी पर्यावरण व नियोजन विभागाशी समन्वय ठेवण्याचेही बजावण्यात आले. मात्र आराखडाही नाही, अंमलबजावणीही नाही, अशीच स्थिती जिल्ह्यात आहे.

# भटके विमुक्तांना निवाऱ्याचा आसरा केव्हा मिळणार



**सडक अर्जुनी:** जिल्ह्यातील सडक अर्जुनी, देवरी, अर्जुनी मोरगाव, आमगाव, सालेकसा या पाच तालुक्यांमधील ३६६ घरकुले मंजूर होऊनदेखील भटक्या विमुक्तांना यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेचा फायदा मिळू शकला नाही. यासाठी ते सातत्याने पाठपुरावा करीत असून त्यांची अद्यापही दाखल घेण्यात आला नाही. त्यामुळे भटके विमुक्तांना निवाऱ्याचा आसरा केव्हा मिळणार? असा सवाल उपस्थित केला जात आहे.

प्रत्येक व्यक्तीला शासनाकडून पक्के घर मिळावे व त्याची आणि त्याच्या कुटुंबाची राहण्याची व्यवस्था व्हावी म्हणून शासनाने विविध प्रकारच्या घरकुल योजना तयार केल्या आहेत. त्यामध्ये पंतप्रधान घरकुल योजना, रमाई घरकुल योजना त्याचप्रमाणे भटक्या विमुक्तांसाठी यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना शासनाने सुरु केली आहे. परंतु सध्या तरी ती कागदावरच आहे.प्रत्यक्षात त्या योजनेचा लाभ घरकुल लाभार्थ्यांना कधी मिळेल हा मात्र प्रश्न आहे.

महाविकास आघाडी सरकारने गोंदिया जिल्ह्यात भटक्या विमुक्तांसाठी यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना मंजूर केली होती. त्याकरिता अर्जदेखील मागितले होते. त्यामध्ये गोंदिया जिल्ह्यातील ८०१ अर्ज प्राप्त झाले होते. त्यापैकी २६६ अर्ज मंजूर करुन पात्र लाभार्थ्यांची एक यादी तयार करण्यात आली होती. ती यादी २८ मार्चला प्रसिद्ध करण्यात आली.

मंजूर घरकूल लाभार्थ्यांच्या एकुण निधी चार कोटी ३९ लाख वीस हजार एवढा आहे. तो शासन निर्णय २८ मार्च २०२२ रोजी निधी मंजूर करण्यात आला होता.

### या लाभार्थ्यांचा समावेश

**गोंदिया जिल्ह्यातील सडक अर्जुनी, देवरी, अर्जुनी मोरगाव, आमगाव, सालेकसा या पाच तालुक्यांतील भटक्या विमुक्त जातीमध्ये मोडणारे पात्र लाभार्थी ढीवर, लोहार, बहुरुपी, खाती, गवळी, बंजारा, गोसावी, केवट, बैरागी, अवतारी, नाथजोगी, धनगर, गावडी या जातींचा समावेश आहे.**

### यांच्या माध्यमातून पाठपुरावा सुरु

**भटक्या विमुक्त जातींना यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेचा लाभ मिळावा म्हणून भटक्या विमुक्त जातीचे कार्यकर्ते महेंद्र दिघरे, रमेश मानकर, रवींद्र मेश्राम यांनी आ.सहषराम कोरोटे यांची भेट घेतली. अखिल महाराष्ट्र भोई समाज सेवा संघ, पुणे प्रणित एकलव्य सेनेचे कार्यकर्तेदेखील या घरकुल योजनेचा लाभ मिळावा म्हणून प्रयत्न करीत होते.**

### आमचे घरकुलाचे स्वप्न केव्हा साकार होणार?

**भकक्या विमुक्त जमातीच्या लोकांनी मोठ्या आशेने आम्हालाही घरकुल मिळेल म्हणून अर्ज भरले होते. त्यांची गरजू लाभार्थी म्हणून निवडदेखील झाली. परंतु जवळपास एक वर्ष होत आले तरी त्यांना आजपर्यंत घरकुल मिळाले नाही. त्यामुळे आम्हाला घरकुल मिळणार की नाही, अशा पद्धतीची शंका त्यांच्या मनात निर्माण झाली आहे. आपल्याला घरकुल मिळावे आणि आपणही चांगल्या घरामध्ये जाऊन राहावे अशा त्यांच्या इच्छेवर पाणी फिरण्याची वेळ आली आहे.**

# एकजूट समाज ही खरी ताकद–खासदार ढालसिंग बिसेन

## राष्ट्रीय पवार क्षत्रीय महासभेचे अधिवेशन उत्साहात



**वर्धा(कारंजा) :** एकजूट ही प्रत्येक समाजाची ताकद आहे. एकजुटीने सर्व समस्यांची सोडवणूक होऊ शकते. ही एकजुटता हुशार विद्यार्थ्यांना सहकार्य करण्यासाठी कामात आणावी, त्यांच्या पाठीशी उभे राहावे, असे आवाहन बालाघाट– शिवनीचे खासदार ढालसिंग बिसेन यांनी केले.यावेळी



राष्ट्रीय पवार क्षत्रिय महासभेच्या संविधानात सुधारणेला मंजुरी देत समाज एकीकरणावर शिक्कामोर्तब करण्यात आले.

कारंजा (घा.) येथील भोयर–पवार समाज सभागृहात शनिवारी राष्ट्रीय पवार क्षत्रिय महासभेच्या पवार, पोवार, परमार, भोयर,पवार समाजाचे अखिल भारतीय अधिवेशन पार पडले. त्यात ते उदघाटक म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रीय पवार क्षत्रिय महासभेचे राष्ट्रीय अध्यक्ष इंजि. मुरलीधर टेंभरे होते. अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष प्रा. भगवान बग्नगरे हे होते. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून जेष्ठ समाजसेवक शंकरलाल पवार, कारंजा नगरपंचायतीचे उपाध्यक्ष भगवान बुवाडे, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा सरिता गाखरे,भोयर पवार महासंघाचे अध्यक्ष डॉ. नामदेव राऊत, महासभेचे माजी अध्यक्ष टी.डी.बिसेन, हरियाणाचे वेदप्रकाश सिंग पवार, राष्ट्रीय पवार क्षत्रिय महासभेचे संघटन सचिव खेमेंद्र कटरे, उपाध्यक्ष राजेंद्र पटले, अशोक बिसेन, माजी अधिष्ठाता गौरीशंकर टेंभरे, शंकरसिंह पवार, महेंद्रसिंग परमार, प्रल्हाद सिंग परमार, श्रावण फरकाडे, प्रा. डॉ. तीर्थनंदन बनगरे, पृथ्वीराज रहांगडाले, अशोक पाठे, माजी प्राचार्य हेमंत ढोले, राज हरणखेडे, प्रभाकर देशमुख, द्वारका प्रसाद हरिणखेडे, महेश परमार, दिलीप रहागंडाले,अर्पण बिसेन,रुपेंद्र कटरे,नामदेव बारंगे,विजय पटले आदींची उपस्थिती होती. कार्यक्रमात मान्यवरांनी समाजाची बोलीभाषा टिकविण्यासोबत समाजाच्या चालीरिती जोपासणे आवश्यक असल्याचे सांगितले. अखिल भारतीय पंवार, पोवार, परमार, भोयर,पवार हे सर्व एकच असून सामाजिक व सांस्कृतिक चालीरीती एकच असल्याने व आपण एकच असल्यामुळे अखिल भारतीय स्तरावरही रोटी–बेटी व्यवहार व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त केली. संस्कृती, परंपरा आणि सम्राट विक्रमादित्य, चक्रवर्ती राजाभोज यांचे विचार घरा–घरापर्यंत पोहोचविण्यासाठी सर्व विखुरलेल्यांना एकत्र आणण्यासाठी या अधिवेशनाच्या माध्यमातून नवीन इतिहास रचला गेल्याचे विचार व्यक्त केले गेले.

**देशाच्या कानाकोपऱ्यातून आले समाजबांधव**

या अधिवेशनात महाराष्ट्रासह छत्तीसगड, मध्य प्रदेश, हरियाणा आदी भागांतील समाजबांधव सहभागी झाले होते. प्रास्ताविक कारंजा तालुकाध्यक्ष भगवान बनगरे यांनी केले.कार्यक्रमात नर्सींग अभ्यासक्रमात देशात ८३ वा क्रमांक व राज्यात प्रथम क्रमांक पटकावल्याबद्दल गोरेगाव तालुक्यातील कु. देवेश्री तेजराम पारधी तर चक्रवर्ती राजाभोज यांच्याप्रतिमेकरीता जागा दान दिल्याबद्दल संतोष बोपचे, पीएचडी प्राप्त केल्याबद्दल पत्रकार डॉ. गणेश खवसे, डॉ. योगेश किनकर आदींचा सत्कार करण्यात आला. संचालन इंदिरा कालभूत व एस.एम.पारधी यांनी केले, तर उपस्थितांचे आभार किशोर हजारे यांनी मानले. यशस्वीतेकरिता राजेश डोंगरे, सुहास टोपले, बाबाराव मानमोडे, सारंग बनगरे, किशोर हजारे, हेमंत बन्नगरे, सचिन भादे, मोहन डोबले, रोशन चौधरी, गजानन चौधरी, टिकाराम चौधरी, टिकाराम घागरे, योगीता खवशी, संगीता डोबले, संगीता दिग्रसे, अनुसया डोबले, चंद्रकला चौधरी, ललिता घागरे, चेतना मानमोडे, हरिभाऊ धोटे आदींनी सहकार्य केले.

